संस्थापकः राजन राजे
KRISHANARPANMASTU
# कृष्णार्पणमस्तु
संपादकः महेशसिंग ठाकूर
RNI: MAHMAR/2023/88105
Volume : 3 | Issue : 11 | Marathi Monthly | Thane, 1 May 2026 to 31 May 2026 | Pages 16 | Price : 10/-

# भाजप-संघीय ‘बनावटी’च्या ‘‘हातच्या कंकणाला, आरसा कशाला’’...???

**भारतातल्या वाढत्या मुस्लिम लोकसंख्येविषयी RSS च्या स्थापनेपासून जाहीरपणे ठणाणा करणारी ‘ढोंगी’ भाजपाई-संघीय नेतेमंडळी, आज वाढलेल्या लोकसंख्येलाच ‘राजकीय-बक्षिशी’ देऊ पहातायत?**

**भविष्यात तर हे असे, ‘पुनर्सीमांकन’ वा ‘परिसीमन’ योजनेतहत (Delimitation) केले जाणारे बदल, ‘घटनादुरुस्ती’ने नव्हेच; तर, ‘साध्या कायद्या’ने करण्याचा भाजप-संघाचा अतिशय धोकादायक व नापाक इरादाही त्यात अनुस्यूत आहे!**

...या सगळ्या ‘डिलिमिटेशन’च्या प्रयासातून, एक राजकीय ‘मतितार्थ’ सुस्पष्टपणे ध्वनित होतोय की, ‘भाजप’च्या धर्मविद्वेषी-राजकारणात ‘मुस्लिम लोकसंख्येचा वाढता दर’, हा फक्त, एक ‘निवडणूक-जुमला’च होय! ...अन्यथा, ते असं काही करु धजावलेच नसते; कारण, त्यातून भाजप-संघीय लोकं नेहमी म्हणतात; तशा, ‘मुस्लिम-जमाती’च्या एकगठ्ठा मतांचा प्रभाव असलेल्या लोकसभा-विधानसभा जागा, नसत्या का वाढल्या?

...ते तर, त्यांना त्यांच्या राजकीय धारणेनुसार व धोरणानुसार बिलकूल चालायला नको ना?? ...म्हणजेच, रेटून खोटं बोलणं व वरुन ‘संस्कृत-शब्दां’चा बादरायण वापर करत, धादांत खोटा प्रसार-प्रचार करत रहाणं (उदा. कामगार-चळवळ मुळापासून उखडून फेकू देऊ पहाणाऱ्या ‘‘४ काळ्या ‘कामगार-संहितां’चा, ‘कामगार-हिताचे कायदे’ म्हणून अपप्रचार करणे इ.)... ...पृष्ठ क्र.५ वर

## भाजप-संघीय अजेंडा



**कामगार-चळवळ मुळापासून उखडून फेकू देऊ पहाणाऱ्या ‘‘४ काळ्या ‘कामगार-संहितां’चा, ‘कामगार-हिताचे कायदे’ म्हणून अपप्रचार करणे**

**मुस्लिम लोकसंख्येचा वाढता दर’, हा फक्त, एक ‘निवडणूक-जुमला’च होय!**

**निवडणुकीदरम्यान ‘‘लाडकी बहीण योजना’’ मतदारांच्या भेटीला येते...**

**महाराष्ट्राच्या नादान राजकारण्यांमुळे परप्रांतीयांना केव्हाचेच ‘आंदण’ दिले गेलेत... या प्रस्तावित ‘पुनर्सीमांकना’तून (Delimitation) परप्रांतीयांना महाराष्ट्रात, अजूनही नव्याने ‘आवतण’, आपसूक मिळण्याचा व त्यातून त्यांची राजकीय-ताकद ‘वाढता वाढता वाढे’, अशी वाढती रहाण्याचा... केवढा मोठा धोका, महाराष्ट्रापुढती उभा आहे, याचं कुणा मराठ्याला भान आहे...???**

## लंपट ज्योतिषाचा राजकीय झंटा-फंटा

... **ज्ञानेश महाराव** *(ज्येष्ठ पत्रकार - संपादक)*

**‘‘दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए’’ हे नाशिकचा लिंगपिसाट ज्योतिषी कॅप्टन अशोक खरात प्रकरणाने पुन्हा दाखवून दिलंय. अशाच्या बदकर्मी धंद्याचं मार्केटिंग ‘‘महाराष्ट्र राज्य महिला आयोग’’च्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी करावं, ह्यात धक्कादायक काही नाही. ही युतीदेखील नवी नाही.** ...पृष्ठ क्र. ९ वर

दि. २३ एप्रिल-२०२६ रोजी बीयूजे हॉल, फोर्ट, मुंबई येथे ‘‘संजय यांच्या स्मरणार्थ’’ आयोजित कार्यक्रम अत्यंत भावनिक वातावरणात पार पडला. कुटुंबीय, मित्र, सहकारी आणि सहकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

या कार्यक्रमास ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष मा. राजन राजे उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतात संजय सिंघवी यांच्या कार्याची, त्यांच्या संघर्षमय आणि प्रगतिशील जीवनाची आठवण करून देत उपस्थितांशी काही भावपूर्ण शब्द शेअर केले.

संजय सिंघवी यांच्या आठवणी, त्यांचे विचार आणि त्यांनी दिलेला लढा - हे सर्व उपस्थितांच्या मनात कायमचे कोरले गेले. हा कार्यक्रम केवळ श्रद्धांजली नव्हता, तर त्यांच्या समृद्ध आयुष्याचा आणि विचारांचा एक सन्मान होता.




अंतरंग


कंत्राटीकरणाविरुद्ध धर्मयुद्धः कामगार चळवळीचा निर्णायक टप्पा
...राजन राजे
पृष्ठ क्र. ४


देशातील शैक्षणिक गोंधळाचा अभ्यासवर्ग
- शुद्धोदन आहेर
पृष्ठ क्र. ६


लंपट ज्योतिषाचा राजकीय झंटा-फंटा
- समाजमाध्यमातून साभार
पृष्ठ क्र. ९

अमेरिका-इस्रायल-इराण शिमग्याचं कवित्व
...राजन राजे,
पृष्ठ क्र. १२

# बुद्धीप्रामाण्यवादाच्या वाटेवर...




**वंदना शिंदे (ठाणे) :** मार्च-२०२६ च्या अखेरीस ठाणे शाखेचा एक कार्यकर्ता, जो ८ ते १० वर्षांपासून त्यांचे गाव जामखेड, जिल्हा आहील्यानगर येथे सहकुटुंब स्थायिक झाला आहे. शेतीबरोबरच तो स्वतः व त्याची पत्नी **M. Pharm** असल्यामुळे तेथेच आरोग्य क्षेत्रातील काम करीत आहेत. त्याच जीवन पवार यांचा मार्च महिन्याच्या अखेरीस मला फोन आला. तो म्हणाला, ''माई, मला माझ्या गावी आपल्या कामाचा, म्हणजेच बुद्धीप्रामाण्यवादाचा प्रसार व प्रचार करायचा आहे. मी थोडा वेळ देऊ शकतो. शिवाय या कामाची इथे खेड्यापाड्यात खूपच गरज आहे.''

एप्रिल महिन्यात ११ एप्रिल महात्मा ज्योतिराव फुले व १४ एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती आहेत. या दोन्ही महापुरुषांच्या जयंतीचे औचित्य साधून मला माझा तालुका जामखेड बुद्धीप्रामाण्यवादी विचाराने ढवळून काढायचा आहे. ''तुम्ही याल का?'' आणि क्षणाचाही विलंब न लावता मी म्हणाले, ''अरे वा, छान!'' मी लगेच होकार दिला. तो स्वतः ठाण्याला मला घ्यायला आला. ९ एप्रिलला रात्रीच्या बसने निघून जामखेडला सकाळी ९ ते १० च्या दरम्यान आम्ही पोहोचलो. चमत्कारांच्या संदरीकरणात अत्यंत प्रभावी होत असलेल्या खिळ्यांच्या पाटांचा समावेश त्याला हवा होता.

जीवनची पत्नीसुद्धा तालुक्यातील बऱ्याच गावांतील बचतगटांचे काम खूपच प्रभावीपणे करते. शुक्रवार दिनांक १०/०४/२०२६ ते १९/०४/२०२६ या कालावधीत मिलिंदनगर, डोणगाव, आरणगाव, जवळा, वाघा, घुलेवाडी इत्यादी १० गावांमध्ये व वाघा येथील शाळेत प्राथमिक (इ. १ली ते ७वी) कार्यक्रम घेतले. तसेच, काही बचतगटांमध्ये सुद्धा चर्चा कार्यक्रम घेतले. तिथेसुद्धा सर्वत्र जोरदार चर्चेत असलेले अशोक खरात व निर्मलबाबा यांच्या कारनाम्यांबद्दल सुद्धा खूपच संवाद झाला. महिलांनी या चर्चेत सुद्धा छानच सहभाग घेतला.

असा हा १० दिवसांचा कालावधी मी सुद्धा छानच एंजॉय केला. त्यांच्या गोड आठवणी सोबत घेऊन मी १९/०४/२०२६ च्या रात्रीच्या बसने निघून दुसऱ्या दिवशी सकाळी घरी पोहोचले.

**जिंदाबाद, जय विज्ञान!**

## ढोंगी-धंदेवाईक विचार विज्ञानाच्या कसोटीवर घासून पहा

*जिथे जिथे पोथीप्रामाण्य मानलं जातं, तिथे तिथे अंधश्रद्धेचा उद्भव होतच असतो. आणि म्हणून आपण काय करायचं? तर शब्दप्रामाण्य टाकून द्या, बुद्धीप्रामाण्य माना. वेदांमध्ये लिहिलं आहे, कुराणामध्ये लिहिलं आहे, किंवा बायबलमध्ये लिहिलं आहे म्हणून ते खरं मानण्याची ही प्रवृत्ती सोडून द्या.*

*ते खरंच खरं आहे का, हे तुम्ही आजच्या वैज्ञानिक कसोटीवर घासून पाहा. त्या कसोटीवरून जर उत्तर आलं की हे बरोबर आहे, तर ते जरूर स्वीकारा. परंतु ते स्वीकारतानासुद्धा हेच शेवटचं सत्य आहे, असं मानू नका.म्हणजे आपल्याला शास्त्रीय दृष्टिकोन - हा जो शब्द वापरला जातो, त्याचा खरा अर्थ हा आहे की शास्त्राच्या कसोटीवर घासून पाहून तुम्ही एखादं सत्य खरं की खोटं ते ठरवा. पण ते ठरवल्यानंतरसुद्धा आपल्याला अंतिम उत्तर सापडलं आहे, असं शास्त्र मानत नाही, विज्ञानसुद्धा मानत नाही - हे लक्षात घ्या.*

*माणसाचं मन असं एक बंद, घुसमटलेलं घर जसं कुणीतरी कुलूप लावून सगळी दारं बंद करून टाकावीत, तशी त्याची अवस्था होते. ती अवस्था टाळण्यासाठी, मनाची कवाडं उघडण्यासाठी आणि विचारशक्ती अधिक जागृत करण्यासाठी हे आवश्यक आहे. कारण ते झाल्याशिवाय समाजपरिवर्तन अशक्य आहे - हे आपल्याला सगळ्यांना माहीत आहे. तोपर्यंत समाजपरिवर्तनाच्या गप्पांना काही अर्थ नाही. माणसाला विचार करायला प्रवृत्त केलं पाहिजे, स्वतंत्रपणे विचार करायला प्रवृत्त केलं पाहिजे. आपण असा समाज तयार केला आहे की जिथे लोक विचार करायला घाबरतात. पण विचारस्वातंत्र्य माणसामध्ये अधिकाधिक खुलत राहिलं पाहिजे.*

***- श्रीराम लागू यांचे भाष्य***

'प्रबोधनकार ठाकरे' यांच्या पठडीतलं थोर विचारवंत, शास्त्रज्ञ जगदीशजी काबरेंचं आजचं आणि कालचं कलामहर्षी डॉ. श्रीराम लागूंचं भाषण-लिखाण... या अशा विचारद्वयीची वा वैचारिक-जुगलबंदीची; गेली पाचसहा दशके महाराष्ट्राच्या विचारविश्वात धुमाकूळ घालणाऱ्या... ढोंगी-धंदेवाईक 'हिंदुत्ववादी-विखारा'च्या पार्श्वभूमीवर, आजच्या महाराष्ट्राला किती नितांत गरज आहे, हे वेगळं सांगायची गरज आहे...???

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)



**ऊन लई जास्त आहे......**
**बिनकामाचे हिंदू नका......**

जंगलात उन्हात पावसात फुफाट्यात
चालून चालून
कित्येक वाटा मी बनवल्या..
त्या कुजलेल्या पायांचे
मातीमय ठसे नीट घ्यायला सांग त्यांना
के वाय सी होऊन जाईल!
या देशाचे तोंड पोत्यात लपविलेस,
हे फार चांगले केलेस रे, माझ्या भावा !

***मोहन देस***



"बे वजह घर से निकलने की ज़रूरत क्या है"
"मौत से आँखे मिलाने की ज़रूरत क्या है"

"सब को मालूम है बाहर की हवा है क़ातिल"
"यूँही क़ातिल से उलझने की ज़रूरत क्या है"

"ज़िन्दगी एक नेमत है उसे सम्भाल के रखो"
"क़ब्रगाहों को सजाने की ज़रूरत क्या है"

"दिल बहलाने के लिये घर में वजह हैं काफ़ी"
"यूँही गलियों में भटकने की ज़रूरत क्या है"

- गुलज़ार

# संघराज्याच्या रक्षणासाठी: ‘स्वायत्त महाराष्ट्र’ हीच दिशा

समस्त मराठी–जनतेनं, आपल्या सर्वंकष हितासाठी, हे ध्यानात घ्यायलाच पाहिजे की, ‘‘परिपूर्ण संघराज्यीय पद्धतीनुसार ‘स्वायत्त–महाराष्ट्रा’ची निर्मिती, निसर्ग–पर्यावरण संरक्षण–संवर्धन, कंत्राटी–कामगार पद्धती नष्ट करण्यासह ‘अर्थक्रांती–जनलोकपाल’ विधेयकांद्वारे भ्रष्टाचार निर्मूलन...हे सगळे मूलगामी–विषय, स्थापनेपासूनच मांडणारा व प्रत्यक्षात बावनकशी प्रामाणिकतेने हाताळू पहाणारा...महाराष्ट्रातला एकमात्र राजकीय पक्ष म्हणजे, ‘धर्मराज्य पक्ष’च केवळ होय!

धर्मराज्य पक्ष–धोरण, हे भविष्यवेधी म्हणूनच ‘दूरदर्शी’ व समस्यांच्या आसाला भिडणारं–जाणणारं आहे, हा ही संदेश मराठी–जनतेत जायलाच हवा; तर आणि तरच, महाराष्ट्राच्या राजकारणावर त्याचे ‘मराठीहित–अनुकूल’ परिणाम होतील...प्रस्थापित ‘मराठी–नेतृत्त्वा’कडून आजवर याबाबतीत भयंकर निराशाच मराठी–माणसाच्या पदरात पडली असल्याने; त्यांच्यावर, असा ‘मराठी–हितैषी’ राजकीय–दबाव निर्णायकरित्या काम करण्यासाठी, हा आवाज उठलाच पाहिजे...त्यांनी यासंदर्भात, काही भूमिका घेणं नाकारल्यास वा टाळल्यास...ते राजकीय महत्कार्य यापुढे, मराठी–माणसाचं भविष्य, त्यांच्या हक्काच्या महाराष्ट्रात सुरक्षित राखण्याकामी तुम्हाला–आम्हाला मिळून करावंच लागेल...जय हो!

**।। जय महाराष्ट्र, जय हिंद ।।**

**(संयुक्त–महाराष्ट्रानंतर आता, ‘स्वायत्त–महाराष्ट्र’... राष्ट्रांतर्गत राष्ट्र, ‘स्वायत्त–महाराष्ट्र’... ‘शिवछत्रपती–राष्ट्र’)**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# सजीव सृष्टीचा शोध: विज्ञान, अध्यात्म आणि ‘प्राणतत्त्वा’चा संगम




संपूर्ण सृष्टी ही ‘त्रिगुणात्मक’ (वेदउपनिषदे–भगवतगीतेनुसार ‘सत्व, रज, तम’ या गुणांनी भरलेली–भारलेली व ‘प्रोटॉन, न्यूट्रॉन, इलेक्ट्रॉन’ या मूलभूत कणांनी प्रत्येक अणूरेणू बनलेला असताना... RSSच्या के. सुदर्शनजी यांच्यासारखी अनेक नेतेमंडळी, वर्ष १९५० ते २००२ दरम्यान (तब्बल ५२ वर्षे) संघ–मुख्यालयावर भारताचा ‘तिरंगा’, हा राष्ट्रध्वज न फडकविण्यामागे ‘‘तीनचा आकडा, हा भारतीय–अध्यात्मानुसार ‘अशुभ’ व ‘अपवित्र’ आहे’’, असा जावईशोध लावून एक बादरायण व निर्बुद्ध तर्कट मांडत असताना... तामीळनाडूमधील ‘Earthworm Man Of India’’ म्हणून मोठ्या प्रसिद्धीस पावलेला ‘सुलतान ईस्माईल’ हा एक ‘मुस्लिम’ जीवशास्त्रज्ञ, भारतीय–अध्यात्मातील ‘‘ब्रह्मांडाच्या चराचरात–अणूरेणूत ‘प्राणतत्त्व’ कसं सामावलेलं आहे...

...माती ही ‘सजीव’ कशी (जेम्स लव्हलॉक’, या ब्रिटीश शास्त्रज्ञाने ‘ग्रीक पुराणकथेतील ‘Gaia', ही मनुष्यरुपात वावरणाऱ्याच ‘पृथ्वीदेवता’वरुन मांडलेल्या मत्रबळर’ सिद्धांतानुसार, ज्याला अलिकडे आधुनिक वैज्ञानिक–परिभाषेत, पृथ्वीवरील सगळ्या सजीवांचा एकमेकाशी असलेला अन्योन्य संबंध आणि त्यांचं पर्यावरणाशी असलेलं तादात्म्य, या अर्थाने ‘Earth System Science’ असं म्हणतात) याची संजीवक मांडणी करताना...जणू भारतीय–अध्यात्मातील ‘अद्वैता’चा (आत्म्याचे ब्रह्माशी एकत्व) किंवा संतसाहित्यातील ‘‘वृक्षवल्ली आम्हा सोयरे’’ किंवा चराचरात सजीव (चर वा हालचाल करणारे) आणि निर्जीव (अचर–स्थिर/जड) अथवा ‘चेतन–अचेतना’मध्ये ‘ईश्वरी रूप’ पाहण्याचा संदेश, हा मुस्लिम शास्त्रज्ञ देतोय... हे किती कमालीचं आश्चर्यकारक व आश्वासक आहे!

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष...भारतातील पहिलावहिला निसर्ग–पर्यावरणस्नेही ‘हरित–पक्ष’...The First ‘Green-Political Party' Of India)

# ब्रेकिंग । स्टॅलिन यांचे दिल्लीला थेट आव्हान! राज्यस्वायत्ततेचा ऐतिहासिक रिपोर्ट सादर – केंद्राची सत्ता हादरली!



आज तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी विधानसभेत हायलेव्हल समितीचा अंतरिम रिपोर्ट सादर केला आहे. या रिपोर्टमध्ये स्पष्टपणे मागणी केली आहे – ‘‘संविधानात दुरुस्ती करा, राज्यांना पूर्ण स्वायत्तता द्या! केंद्र–राज्य संबंधांचा पुनर्विचार करा, संघराज्य व्यवस्था मजबूत करा!’’

स्टॅलिन म्हणतात: ‘‘आम्ही दिल्लीचे गुलाम नाही. आम्ही भारताचे समान भागीदार आहोत. केंद्र सरकार राज्यांच्या हक्कांवर हळूहळू गदा आणत आहे – निधी रोखतो, अधिकार हिसकावतो, केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर करून विरोधकांना संपवण्याचा प्रयत्न करून संघराज्याची भावना संपवतो.’’

ही केवळ तमिळनाडूची मागणी नाही. ही संपूर्ण भारतातील २८ राज्यांच्या गरजेचीच मागणी आहे!

मोदी सरकारने काय केलं?

- राज्यांच्या अधिकारांवर केंद्राचे नियंत्रण वाढवलं.
- निधी वाटपात भेदभाव.
- शिक्षण, आरोग्य, भाषा, जलसंपत्तीवर दिल्लीचे एकछत्री राज.
- केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर करून विरोधकांना संपवण्याचा प्रयत्न
- खऱ्या संघराज्याऐवजी एकतंत्र (unitary) व्यवस्था बनवली.

स्टॅलिन यांनी धाडसाने सांगितलं – ‘‘राज्यांना स्वशासन हवं, केंद्रात coalition government हवी, तरच खरा विकास होईल!’’ हा आवाज फक्त द्राविडियन नाही, तर ‘खऱ्या भारतीय लोकशाहीचा’ आवाज आहे.

महाराष्ट्र, गुजरात, पंजाब, बंगाल, केरळ... प्रत्येक राज्याला हा प्रश्न विचारायला हवा:

आम्ही दिल्लीला कधी सांगणार – ‘‘आमचे हक्क आम्ही ठरवू!’’

स्टॅलिन यांनी दाखवलेलं धैर्य पाहून अभिमान वाटतो. कारण ते फक्त आपल्या राज्यासाठी लढत नाहीत – संपूर्ण देशातील संघराज्याच्या रक्षणासाठी लढत आहेत. मोदींच्या केंद्र सरकारने राज्यांना दुर्लक्षित करून, सत्तेचं केंद्रीकरण करून देशाची एकता कमकुवत केली आहे. ही गोष्ट आता थांबायला हवी!

आता तुम्ही सांगा –

स्टॅलिन यांनी घेतलेली ही भूमिका बरोबर आहे का?

इतर राज्यांनीही हा मुद्दा उचलावा का?

महाराष्ट्र कधी पुढे येईल?

कमेंटमध्ये तुमचं मत निर्भीडपणे लिहा. शेअर करा – ज्यांना खरी जागृती हवी आहे, त्यांच्यापर्यंत ही आग पोहोचवा!

***– प्रशांत दौंडकर***

**जय हिंद । जय महाराष्ट्र । जय संघराज्य!**

# कंत्राटीकरणाविरुद्ध धर्मयुद्धः कामगार चळवळीचा निर्णायक टप्पा

''माझ्या शासकीय-कर्मचारी मित्रांनो आणि भगिनींनो, देवेंद्र फडणवीस यांच्या 'NDA' सरकारकडून अनेकदा फसवणूक झाल्यामुळे, आज इथे तुम्ही प्रामुख्याने निवृत्ती वय ५८ वरुन ६० वर्षे व्हावं व पूर्वीचीच निवृत्तिवेतन सुविधा मिळावी म्हणून, 'राज्यव्यापी संप' करत असताना; तिथे, द. कोरियात जगविख्यात ह्युंदाई कंपनीचे कामगार-कर्मचारीवर्ग याच मुद्द्यांवर लढतायत...पण, या दोन्ही लढ्यांतील गुणात्मक फरक केवढा मोठा आहे? ते निवृत्ती वय, ६० वरुन ६५ वर्षे करण्यासाठी लढतायत आणि त्यांच्या आजच्या वेतन वा निवृत्तीवेतन सुविधा पाहिल्यावर आपले डोळे पांढरे होतील. मित्रांनो, जगभरात सर्व प्रगत राष्ट्रांमध्ये निवृत्ती वय ६० वर्षांच्या पलिकडे याआगोदरच आहे आणि जपानमध्ये तर, ७०-७५ वर्षांपर्यंत कामगार-कर्मचारी सुखेनैव नोकऱ्या करु शकतात व त्यानंतरही, त्यांच्या औषधोपचारांची व जीवनमानाची परिपूर्ण काळजी घेण्याची कॉर्पोरेटीय क्षेत्राकडून व्यवस्था झालेली असते. कुठलाही लढा, हा तुमच्याकडून 'त्याग' मागत असतो; तुमची 'सत्वपरीक्षा' घेत असतो...वानगीदाखल उदाहरण घ्यायचंच झालं तर, मी गेली चारपाच दशके अध्यक्ष असलेल्या सुल्झर पंप्स (दिघा-अंबरनाथ) कंपनीतील युनियनच्या कडव्या संघर्षाचं देईन...ही कथा, त्या कंपनीची आहे, जिने कामगार-कर्मचारीवर्गाला सहा आकडी (एक लाखाहून अधिक) बोनस व सहा आकडी पगार देऊन वर्ष-२००७पासून सातत्याने औद्योगिक क्षेत्रात एक चमत्कार घडवला होता! मात्र, सगळं उत्तमरित्या चाललं असतानाच; कंपनीत मोठ्या प्रमाणावर 'कंत्राटी-कामगार पद्धत' राबवून, कंपनीचा नफा बेसुमार वाढवण्याच्या राक्षसी हव्यासाने, वर्ष २०१९-२०पासून नव्या व्यवस्थापनाने गेली जवळपास ७ वर्षे, युनियनशी एकनिष्ठ राहिल्याबद्दल अचानक कामगारांवर कुऱ्हाड चालवायला घेतली. अनेकांना निलंबित केलं; तर, ३ जणांना नोकरीतून काढून टाकले. एवढंच नव्हे, तर जसा तुमच्याकडे 'मेस्मा' कायद्याचा वरवंटा फिरवण्याची 'फसणवीस'जी धमकी देत असतात; तसाच 'कंपनी-दहशतवाद' पसरवून (Corporate-Terrorism) कामगारांवर दबाव-दहशत निर्माण करण्याचा, नव्या कामगारघातकी व्यवस्थापनाने करत, बहुतांश संघटनानिष्ठ कामगारांना गेली पाचसहा वर्षे, एक रुपयादेखील पगारवाढ अथवा बोनस न देता...त्यांचं अंदाजे प्रत्येकी १५ लाखाच्या आसपास नुकसान करुनदेखील बहुसंख्य कामगार मूळ संघटनेशी व संघटना-नेतृत्त्वाशी आजवर प्रामाणिक व एकनिष्ठ राहिलेले आहेत...या जाज्वल्य




उदाहरणातून खूप काही शिकण्यासारखं आपल्या सर्वांनाच आहे; कारण, 'कामगार-चळवळ' जिवंत राहिली, तर आणि तरच, तुमचे न्याय्य हक्क, तुमचा सन्मान व तुमच्या नोकऱ्या सुरक्षित रहातील... अन्यथा, संपूर्ण देशात लढा देणारा एकमात्र 'कामगार-पुढारी' म्हणून, ज्या 'कंत्राटी-कामगार पद्धती'विरुद्ध निकराने गेली तीनचार दशके मी 'धर्मयुद्ध' पुकारलंय व त्यातूनच, माझ्या पक्षाचं नाव 'धर्मराज्य' आलंय...त्या 'कंत्राटीकरणा'तूनच, देशातल्या अवघ्या औद्योगिक व सेवा क्षेत्रात, जशी 'नव-अस्पृश्यता' व 'गुलामगिरी' आली; तशीच तुमची व पुढील पिढ्यांचीदेखील 'गुलामा'सारखी अवस्था होईल...कारण, मी तडफडून-तळमळून सांगत होतो; तेव्हाच ती ठिणगी विझवणं सोपं काम होतं; आता, त्या ठिणगीनं वणव्याचं रौद्ररूप धारण केलंय...तेव्हा, सावध व्हा आणि विजय मिळेपर्यंत, आपलं इप्सित साध्य होईपर्यंत निकराने लढा; 'धर्मराज्य'ची वानरसेना व मी, तुमच्या सदैव पाठिशी आहोत!''....

***'धर्मराज्य पक्ष' व 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे अध्यक्ष असलेले प्रख्यात कामगार नेते, 'राजन राजे' यांचा, संपकरी शासकीय-कर्मचाऱ्यांसमोर एल्गार (दि. २१ एप्रिल-२०२६)...!!!***

## निलीमा बंडेलू यांची ही पोस्ट कॉ. भास्कर जाधव या जुन्या कम्युनिस्ट नेत्याबद्दल खूप काही सांगून जाणारी.

### कॉ. गोविंद पानसरेंच्याबद्दल वाट्टेल ते बरळणाऱ्या खुनशी गुंडांच्या डोक्यात हे शिरणे कठीण आहे. यापेक्षा आणखी काय सांगावे?

### भूमिगत असताना पकडायला आलेल्या पोलिसांना पोटभर जेवण घालणाऱ्या एका पूर्णवेळ कम्युनिस्ट कार्यकर्त्याची गोष्ट

माझ्या बालपणीची गोष्ट आहे

पाच-सहा वर्षाची असेल आणि धाकटा भाऊ अभय माझ्यापेक्षा लहान होता, तेव्हा वडील कॉम्रेड भास्करराव जाधव भूमिगत होते, दोन महिने आम्हाला ते भेटले नव्हते, असेच एकदा रात्री एक दीड च्या सुमारास ते घरी आले. दाढी वाढलेली, थकलेले, अंगावर मळकट कपडे असा एकूण त्यांचा होता.

त्यांच्यासोबतच चार पोलीस घराच्या पायऱ्या चढून जिन्यावरून घरात आले .

त्यांना पाहिल्यावर आम्हाला खूप आनंद झाला. पण पोलिसांना पाहून आम्ही थोडे घाबरलोही. तेवढ्यात दादांनी आईला सांगितलं, ''माझ्यासाठी आणि विशेषतः या पोलिसांसाठी स्वयंपाक कर आणि त्यानंतर चहा कर, कारण हे भुकेले आहेत'' आई म्हणाली की, हे तुम्हाला धरायला आलेत मी का यांच्यासाठी स्वयंपाक करू? तेव्हा वडील म्हणाले, यांना माहिती आहे की, आम्ही गरिबांसाठी कष्टकऱ्यांसाठी काम करणारे कार्यकर्ते आहोत; परंतु, ही त्यांची ड्युटी आहे आणि ती ते करतात, मला शोधण्यासाठी हे उपाशीपोटी रात्रंदिवस काम करत होते.

आईने स्वयंपाक केला आणि त्यांना पोटभर जेवू घातलं. जेवताना देखील याच गोष्टींवर ते बोलत होते. आईने स्वच्छ कपडे भरून बॅग वडिलांकडे दिली आणि जेवण करून आंघोळ करून वडील त्या पोलिसांबरोबर निघून गेले. ही घटना माझ्या व माझ्या भावाच्या बालमनावर जी कोरली गेली ती आजपर्यंत तशीच आहे. आज कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? या पुस्तकावरून चाललेला राडा आणि सनदशीरमार्गाने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना केली केलेली मारझोड हे सगळं पाहताना वरील घटना पुन्हा एकदा आठवले.

खरंतर मार्क्स म्हणतो त्याप्रमाणे, स्टेट चालविण्यासाठी पोलीस यंत्रणा आणि लष्कर ही साधनं वापरल्याशिवाय भांडवलशाहीमध्ये स्टेटचे कामकाज सुरळीत होऊ शकत नाही. पोलिसात भरती होणारी आपलीच गरिबांची लेकरं असतात आणि आपल्याच माणसांविरुद्ध त्यांना दडपशाही करावी लागते. पोलिसांनी निर्दयपणे केलेल्या लाठीमाराचे हे समर्थन नाही, त्यांना वापरणारे आणि चालवणारी यंत्रणा ज्या पद्धतीने काम करते त्याच्याच हा परिणाम आहे.

कॉम्रेड पानसरे यांनी काहीही गैर किंवा चुकीचं काम केलेलं नाही हे पोलीसही जाणतात, ते गरिबांसाठी कष्टकऱ्यांसाठी तळमळीने काम करणारे आणि अत्यंत अल्प अशा गरजांवर आयुष्य काढणारे पूर्ण वेळ कार्यकर्ते होते आणि असे अनेक कम्युनिस्ट कार्यकर्ते ज्यांनी आपलं आयुष्य कामगार कष्टकरी दलित आणि स्त्रिया यांच्यासाठी वेचलं आणि हे काम करता करता त्यांनी आपला देह झिजवला, आज घराघरात झोपडी झोपडीत अशा कार्यकर्त्यांनी केलेल्या कामामुळे अनेकांच्या चुली पेटत आहेत, अशा सर्व कार्यकर्त्यांना मानाचा मुजरा.

# सिंगारदान: एक वैचारिक संक्रमण

# ‘दंगलीत वेश्यांचीही लूट झाली होती...’

ही शमोएल अहमद यांच्या प्रसिद्ध कथेची पहिली ओळ आहे. कथेचा सारांश असा आहे की, जेव्हा नादिरशहाने दिल्लीत आपल्या सैन्याला मोकळीक दिली होती, तेव्हा तीन दिवस आणि तीन रात्री शहरावर कयामत ओढवली होती. लूटमार आणि दंग्यांमध्ये तेव्हाही स्त्रिया आणि संपत्तीच केंद्रस्थानी होती. इतिहासातील लुटीची यादी लिहायची झाली तर लाल शाई संपेल पण यादी संपणार नाही. त्या काळातील लुटीमध्ये नसीम जानचा कोठाही लुटला गेला, जो त्या काळातील सर्वात भव्य कोठा होता.

जेव्हा दंगलखोर नसीम जानच्या कोठ्याची पायरी चढत होते, तेव्हा ब्रजमोहन सर्वात पुढे होता. दंगल असो वा युद्ध, सर्वात जास्त स्त्रियांची अब्रू आणि पराभूतांची संपत्ती लुटली जाते. पण त्या दिवशी दंगलखोरांना नसीम जानच्या शरीरात रस नव्हता; त्यांना कोठ्यातील मालमत्ता हवी होती. तिथेच ब्रजमोहनच्या हाती लागला हस्तिदंताचा एक अतिशय देखणा ‘सिंगारदान’ (शृंगारपेटी).

नसीम जान त्याच्या पाया पडली आणि गयावया करू लागली, ‘हे माझे खानदानी सिंगारदान आहे, याला सोडून दे.’ पण जेव्हा सैतान डोक्यात शिरतो, तेव्हा माणूस काहीच ऐकत नाही. ब्रजमोहनने तिला जीवे मारण्याची धमकी दिली आणि तो सिंगारदान आपलासा केला.

सिंगारदान घरी आला. घरात पत्नी आणि तीन मुली होत्या. आणि त्यानंतर जे घडले, तीच खरी कथा आहे.

ते सिंगारदान स्वतःच इतके सुंदर होते की, त्याचा आरसा घराचा आरसा बनला. तो सर्वांना आपल्याकडे आकर्षित करू लागला. स्वतःला न्याहाळणे ही सर्वांची सवय झाली, मग नटणे ही गरज बनली आणि शेवटी ‘दिसणे’ हेच ध्येय बनले. चेहऱ्यावर पावडर वाढली, अदा बदलल्या, नजरा बदलल्या.

गॅलरीत उभ्या असलेल्या मुलींना आता हे चांगलेच उमजले होते की, कोणत्या हालचाली कोणाला भुरळ घालतात. मुली बदलल्या, पत्नी बदलली चाल, ढब, तिळ, काजळ, शृंगार सगळंच बदललं. घराबाहेर टवाळखोरांच्या नजरा खिळू लागल्या आणि घराच्या आत ब्रजमोहनचे अस्तित्व पुसले जाऊ लागले. एके दिवशी, सिंगारदानच्या आरशात नसीम जान हसली आणि म्हणाली... ‘घरात आता माझे अस्तित्व आहे.’

कथेच्या शेवटी ब्रजमोहन डोळ्यांत काजळ घालून, मनगटावर गजरा गुंडाळून, गळ्यात लाल रुमाल बांधून उभा आहे आणि आता तो स्वतःच्या पत्नीचा आणि तीन मुलींचा दलाल बनला आहे.

आजचा ‘सिंगारदान’ काय आहे?

आता मुद्द्यावर येऊया सामाजिक आणि व्यावहारिकदृष्ट्या आपण नक्की काय आहोत? आपण आपल्या विचारांचेच गुलाम आहोत. जसे विचार असतात, तसेच आपले व्यक्तिमत्त्व घडते. आणि आपले विचार आपोआप बदलत नाहीत, तर ते बदलले जातात.

हळूहळू, छुप्या पद्धतीने, ‘धीम्या विषा’प्रमाणे एका सिंगारदानच्या माध्यमातून... आणि आजचा सिंगारदान काय आहे?

...पृष्ठ क्र. ७ वर

## भाजप-संघीय ‘बनावटी’च्या ‘‘हातच्या कंकणाला, आरसा कशाला’’...??? ...पृष्ठ क्र. १ वरुन

हा भाजप-संघीय अजेंडा, अगदीच लाजिरवाण्या पद्धतीने उघडा पडलाय, तो इतका की, आता ‘‘हातच्या कंकणाला, आरसा कशाला?’’

...शिवाय, जशी निवडणुकीदरम्यान ‘‘लाडकी बहीण योजना’’ मतदारांच्या भेटीला येते; तशीच, आपला खतरनाक दीर्घकालीन ‘राजकीय-स्वार्थ’, कसाही करुन एकदाचा साधून घेण्यासाठी म्हणून...या ‘पुनर्सीमांकना’च्या (Delimitation) विधेयकाला ‘‘विधिमंडळातील ‘महिला-आरक्षणा’ची चमचमीत फोडणी द्यायला, भाजप-संघीय मंडळी विसरलेली नाहीतच!

वर्ष-२००९च्या लोकसभा व त्यानंतरच्या विधानसभा निवडणुकांसाठी झालेल्या ‘पुनर्सीमांकन’ (२००१च्या जनगणनेनुसार) योजनेपूर्वी (Delimitation)...म्हणजेच, २००९च्या निवडणुकांपूर्वी, शेतीप्रधान ग्रामीण भारत, हा लोकसभा-विधानसभा, या दोन्ही कायदे-मंडळावर आपला बऱ्यापैकी वचक राखून होता... पण, महाराष्ट्राचं वानगीदाखल उदाहरण घेतलं; तर, २००९नंतर ‘‘पुणे-मुंबई-ठाणे’’, ही विधानसभा-जागांच्या दृष्टीने, एक ‘‘२४-३६-२४’’ (एकूण २८८ जागांपैकी तब्बल ८४ जागा...म्हणजे, जवळपास ३०% जागा) मापाची ‘कोकाकोला’च्या बाटलीसारखी वा एखाद्या मदनिकेसारखी मादक आवृत्तीच बनली; ज्यातून, ग्रामीण महाराष्ट्राचं ‘राजकीय-वजन’ सौंदर्यस्पर्धेतील ‘मॉडेल’च्या सडपातळ बांध्यासारखं कमालीचं घटलं... जे केवळ, ग्रामीण जनतेच्या अहिताचंच नव्हे; तर, महाराष्ट्राच्या निसर्ग-पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून देखील अतिशय हानिकारक ठरलं! ‘कार्बनकेंद्री’ विनाशकारक विकास-प्रकल्पांची बेछूट भरमार, त्यातूनच महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात होऊ लागली, हे विसरुन चालेल?

...आणि, या ‘पुनर्सीमांकना’तून (Delimitation) आता तर, निसर्ग-पर्यावरणाचा विध्वंस करणाऱ्या व पुढील पिढ्यापिढ्यांच्या भविष्यात अंधाराचं ताट वाढून ठेवणाऱ्या... अति उच्छृंखल व उच्छाद घालणाऱ्या, ‘काँक्रिट-विकासा’च्या नावाने, शहरी दादागिरी व जबरदस्तीला भयंकर ऊत येत जाईल व जेव्हा जेव्हा भविष्यात, हे असं ‘पुनर्सीमांकन’ (Delimitation) नव्याने सहजी होत जाईल; तेव्हा तेव्हा चढत्या भाजणीने व तीव्र गतीने, निसर्ग-पर्यावरणावरचे आघात वाढत जातील! लक्षात घ्या, ही ‘मुं.ठा.पु.रा.ना.’ शहरे-जिल्हे (मुंबई, ठाणे, पुणे, रायगड, नाशिक-नागपूर) याअगोदरच, महाराष्ट्राच्या नादान राजकारण्यांमुळे परप्रांतीयांना केव्हाचेच ‘आंदण’ दिले गेलेत... या प्रस्तावित ‘पुनर्सीमांकना’तून (Delimitation) परप्रांतीयांना महाराष्ट्रात, अजूनही नव्याने ‘आवतण’, आपसूक मिळण्याचा व त्यातून त्यांची राजकीय-ताकद ‘वाढता वाढता वाढे’, अशी वाढती रहाण्याचा... केवढा मोठा धोका, महाराष्ट्रापुढती उभा आहे, याचं कुणा मराठ्याला भान आहे...???

‘जागतिक-तापमानवाढी’सारख्या (Global-Warming) पर्यावरणीय महासंकटाच्या पार्श्वभूमीवर केवळ, ‘जल, जंगल, जमीन’च नव्हे; तर, ‘जनसंख्या व जीवनशैली’ देखील नियंत्रित करणारी ‘पंचसूत्री’ अवलंबण्याची नितांत गरज असताना; या अशा ‘पुनर्सीमांकना’तून (Delimitation)...प्रचंड कार्बन-ऊत्सर्जन करणाऱ्या शहरी चंगळवादी-जीवनशैलीला आणि उत्तरेच्या लोकसंख्येच्या विस्फोटाला मोठी चालना मिळून...शिस्तबद्ध व प्रगतीपथावरील असलेल्या दक्षिण-भारतासह महाराष्ट्र व उत्तरपूर्व भारताला चांगल्या वर्तनाबद्दल... भाजप-संघीयांच्या निर्गल ‘राजकीय-स्वार्था’साठी ‘‘एकूण टक्केवारीत कमी लोकसभा-जागा मिळण्याची’’, ‘उफराटी’ सजा फर्मावली जाणार आहे...

...तेव्हा, सावध होऊन काळाच्या हाका ऐका!

।। जय महाराष्ट्र, जय हिंद ।।

संयुक्त-महाराष्ट्रानंतर आता, ‘स्वायत्त-महाराष्ट्र’... राष्ट्रांतर्गत राष्ट्र, ‘स्वायत्त-महाराष्ट्र’...‘शिवछत्रपती-राष्ट्र’!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष...भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणस्नेही ‘हरित-पक्ष’...The First ‘Green-Political Party' Of India)

*वि. सू. : कालपरवापर्यंतचं शेतकरी-आंदोलन असो वा लष्करातील ‘अग्निवीर-योजना’ असो अथवा आजचे ‘४ काळे कामगार-कायदे’ असोत...किंवा (जातधर्मात खोलवर अडकल्याने स्वाभाविकच भाजपचा मोठा राजकीय-प्रभाव असलेल्या) अडाणी-अज्ञानी उत्तर भारताच्या लोकसभा-विधानसभा जागा, दक्षिणेतल्या राज्यांच्या तुलनेनं वाढण्याचा गंभीर प्रश्न असो... तामीळनाडूसह सगळा दक्षिण भारत त्याविरुद्ध आवाज उठवतोय; पण, महाराष्ट्र नेहमीप्रमाणेच शांतच... कारण, अशा सर्वच वेळी उभा ‘महाराष्ट्र’, एकतर पाठकणा जमिनीवर टाकून गाढ झोपलेला असतो अथवा तो शहरी-गल्लीबोळात वा ग्रामीण-शेताडात क्रिकेट खेळत असतो किंवा गणेशोत्सव, नवरात्रोत्सव-चैत्रोत्सव, दहीहंड्या, गरबे, भंडारे वगैरे कुठल्यातरी सार्वजनिक-मंडळांच्या उत्सवात दंग असतो; नाहीतर, कुठल्याशा धर्मसंप्रदायातल्या ‘षंढ’ गर्दीतला एक भाग बनलेला असतो...अन्यथा, कुणी कशानिमित्ताने दिलेल्या ओल्यापार्टीत वा कुणाच्या हळदीत दारु पिऊन धिंगाणा घालत असतो...किंवा, त्या धबडग्यातून उरलासुरलेला वेळ गुंड, बदमाष राजकारण्यांकडे आभाळभूत नजर लावून भिकेची झोळी पसरण्यात धन्यता मानून असतो... तेव्हा, तो असा, ‘शिवबा-संतां’चा उरला नसलेला; ‘नादान व निद्रीस्त महाराष्ट्र’ जागा होणे नाही...तसा प्रयत्न करुन पहाण्यापेक्षा, दगडावर डोकं आपटणं, काय हो वाईट...???*

# देशातील शैक्षणिक गोंधळाचा अभ्यासवर्ग

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने उच्च माध्यमिक (बारावी) परीक्षेचा निकाल २ मे-२०२६ रोजी, म्हणजे नेमका 'नीट' परीक्षेच्या आदल्या दिवशी जाहीर केला आहे. त्यांतील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी (विशेषतः त्यांच्या पालकांनी!) परीक्षेतील गुणांवर स्वतःला जोखण्याऐवजी पुन्हा प्रयत्न करणे श्रेयस्कर! हे सांगून झाल्यावर आपण उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करू या !

'नीट' परीक्षा आज म्हणजे ३ मे-२०२६ रोजी होणार आहे , हे जगजाहीर होते. मग महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने 'नीट' परीक्षा झाल्यावर हा निकाल जाहीर का केला नाही? या निकालाच्या 'मुहूर्तामुळे' पालक व विद्यार्थीवृंद गोंधळात पडले आहेत. तथापि, हा प्रश्न बारावीच्या निकालाच्या वेळेचा नसून एकूणच भारतीय शिक्षणव्यवस्थेचा आहे, हे सर्वप्रथम लक्षात घेऊ या!

आपल्या देशासमोर शिक्षणव्यवस्थेचा अभ्यासक्रम, शिक्षकांचा दर्जा व नियुक्ती, विद्यार्थ्यांचे आकलन व मूल्यमापन जोखणारी परीक्षापद्धती, पदवीधर मुलीमुलांची रोजगार मिळवण्याची क्षमता, असे एकाहून एक अक्राळिविक्राळ शैक्षणिक प्रश्न आहेत.

या निमित्ताने शिक्षणक्षेत्रांतील भारतीय धुरीणांनी अंतर्मुख होऊन काही चिंतन मनन करायला हवे. आपल्या देशातील इयत्ता दहावी - बारावी समकक्ष मुलगी-मुलगा व विकसित देशातील समकक्ष मुलगी-मुलगा यांच्या शैक्षणिक दर्जात काही तफावत आहे का? जीवनातील समस्यांना तोंड देण्याची व त्यांचा उलगडा करण्याची अमेरिका, जपान, चीन, जर्मनी, युके, फ्रान्स, फिनलँड, स्वीडन, दक्षिण कोरिया, तैवान, थायलंड आदि देशांतील विद्यार्थ्यांची क्षमता व आपल्या देशातील समकक्ष - समवयस्क विद्यार्थ्यांची क्षमता यांत काय साम्य - फरक आहे? जर विकसित देशातील मुलीमुले जास्त सक्षम असतील तर उद्या ती सगळ्या जगाची सूत्रे आपल्या हातात ठेवतील व आपल्या देशातील मुलीमुलांना कळसुत्री बाहुल्यांप्रमाणे नाचवतील! हे टाळण्यासाठी शिवराय, महात्मा फुले, सुधारक आगरकर, शाहूजी राजे, लोकमान्य टिळक, शाहूजी राजे, डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस, पेरियार रामासामी नायकर, कांशीराम यांच्या देशातील धुरीणांनी काही उपाययोजना करायला नकोत काय?

'असर - ग्रामीण २०१८' अहवालानुसार, देशातील सरकारी शाळांतील पाचवीच्या ५६ टक्के; तर, खाजगी शाळांतील ३५ टक्के विद्यार्थ्यांना दुसरीचे पुस्तक वाचता येत नाही. तसेच, देशातील सरकारी शाळांतील आठवीच्या ६० टक्के; तर, खाजगी शाळांतील ४४ टक्के विद्यार्थ्यांना भागाकार येत नाही. अशा देशातील विद्यार्थ्यांचे (व त्या देशाचेही!) काय भवितव्य आहे? आम्ही एकीकडे तोंडवर करून आपल्या देशातील महामानवांची नावे (तीदेखील बहुधा जातसापेक्ष!) घेतो व दुसरीकडे ज्या महामानवांनी या देशावर जीवापाड केले त्याच देशातील विद्यार्थ्यांना जगाच्या बरोबरीने आणण्यासाठी काय करावे लागेल? यांबाबत विचारदेखील करीत नाही! अशा परिस्थितीत आम्हाला देशातील शिक्षणव्यवस्थेचा दर्जा व विद्यार्थ्यांची गुणवत्ता यांबाबत तळमळ वाटतेय यांवर कसा व कोणाचा विश्वास बसेल?

या निमित्ताने हल्ली आपल्या देशात प्रवेश परीक्षेचे जे



'पीक' आले आहे, त्यांबाबत बोलायला हवे. २८ राज्ये व ८ केंद्रशासित प्रदेश यांचा समावेश असलेल्या आपल्या देशाचे वैविध्य मनोवेधक आहे. या वैविध्यासह वेगवेगळे ताणतणाव येणे साहजिकच आहे. तथापि, जागतिक स्तरावरील वैविध्य व ताणतणाव हे अधिक उच्चस्तरीय आहेत! मात्र जागतिक पातळीवर 'जीआरई', 'टोएफल', 'जी मॅट', आयईएलटीएस' अशा काही मोजक्याच परिक्षांद्वारे केलेले मूल्यांकन विविध जगात विकसित समजल्या जाणाऱ्या देशांतील विद्यापीठांद्वारे मान्य केले जाते. या परीक्षा देऊन कोणत्याही देशातील कोणीही विद्यार्थी जगातील कोणत्याही विद्यापीठांत प्रवेश घेऊ शकतो. जर जागतिक स्तरावर अशा काही मोजक्याच परिक्षांद्वारे प्रवेशप्रक्रिया विनासायास पार पाडली जात असेल तर, आपल्या देशात प्रवेशासाठी अनेकविध परिक्षांचा गोंधळ का घातला जातो? इंजीनीअरिंगसाठी अनेक प्रवेशपरिक्षा, मेडिकलसाठी अनेक प्रवेशपरिक्षा, कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी प्रवेशपरिक्षा, यांशिवाय खाजगी विद्यापीठाच्या प्रवेशपरिक्षा वेगळ्याच! या विविध परीक्षांद्वारे आपण आपल्याच देशातील विद्यार्थ्यांना किती पिळून काढायचे? साधारणपणे वयाच्या १८ व्या वर्षी इंजीनीअरिंगला जाणाऱ्या मुलीमुलांना आपल्या राज्यातील प्रवेश परिक्षा, एआयईईई, जेईई व विविध खाजगी विद्यापीठांच्या प्रवेशपरिक्षा एवढ्या अग्निदिव्यातून जावे लागते. यांशिवाय १२ वीची परीक्षा पास होण्याचा ताण तो वेगळाच! आपल्याच देशातील या कोवळ्या मुलीमुलांना एवढा त्रास आपण का बरे देत आहोत? संपूर्ण देशातील इंजिनीअरिंगचे प्रवेश एकाच परिक्षेद्वारे निश्चित का केले जाऊ शकत नाहीत? जर अभ्यासक्रमांत काही फरक असेल तर माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या एखाद्या निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली विख्यात शिक्षणतज्ज्ञांची व समाजशास्त्रज्ञांची समिती स्थापन करून ही समस्या का सोडविली जात नाही? आवश्यकता वाटल्यास त्यात 'टाटा इन्स्टीट्यूट ऑफ सोशल सायन्स' या नामवंत संस्थेचाही समावेश करता येईल. हा एकाच प्रवेशपरिक्षेचा निकष, मेडिकल व इतर विद्याशाखांनाही लावायला हवा. सर्व जगातील 'टॉप रँकिंग' विद्यापीठे मोजक्याच प्रवेशपरिक्षांचे मूल्यांकन मान्य करीत असतील; तर, आपण त्यातून काही शिकायला नको काय?

असे न होण्यामागील प्रमुख कारण म्हणजे देशांतील विविध समाजघटकांचा व राज्यांचा परस्पर अविश्वास हेच आहे. प्रांतवार सांस्कृतिक विभिन्नता, या विभिन्नतेला आलेले अस्मितेचे धारदार कंगोरे, भाषिक अमित्रभाव व आर्थिक असमानता यांमुळे आपण स्वातंत्र्याचा हिरक महोत्सव ओलांडला तरी अनेक साध्या साध्या समस्या सोडवू शकलेलो नाही, हे कटू सत्य आहे. या कारणांत सैतानी जातीसंस्थेचा उल्लेख केला नाही; तर, तो जातीसंस्थेवर फार मोठा अन्याय होईल ! प्रवेशपरीक्षा कोणतीही का असेना, पण माझ्या जातीला किती जागा मिळतील? आजही याच प्रश्नाभोवती आमचे 'राष्ट्रीय' विचार पिंगा घालत आहेत. मग देशाच्या भल्याचा विचार करायला कोणाला वेळ मिळणार? याच संकुचित विचारापोटी 'शूद्र' ओबीसींच्या किमान दहा हजार जागा वैद्यकिय प्रवेशपरिक्षेत 'नीट' गहाळ झाल्या. अशा वेळेस शूद्रांना शिक्षण मिळू नये म्हणून केलेल्या कटकारस्थानांचा इतिहास झर्रकन नजरेसमोर उभारतो. जात ही अराष्ट्रीय असते ती अशी!

सरतेशेवटी, देशातील शिक्षणव्यवस्थेवर आपण किती खर्च करीत आहोत? या वर्षी केंद्र शासनाचा अर्थसंकल्प ₹५३,४७,३१५/- कोटी एवढा आहे. त्यांत शिक्षणासाठी किती तरतूद आहे? तर अवघी ₹१,३९,२८९/- कोटी! एकूण अर्थसंकल्पाचा विचार केल्यास हा निधी अवघा २.६% एवढाच आहे! ज्या देशांतील नामवंत विद्यापीठांत जाण्यासाठी आपल्या देशांतील 'बुद्धिमान' विद्यार्थी जीवाचा आटापीटा करीत असतात ते देश आपल्या शिक्षणव्यवस्थेवर जीडीपीच्या सुमारे ६% खर्च करतात! जीडीपी (म्हणजे सकल राष्ट्रीय उत्पन्न!) आणि अर्थसंकल्प (बजेट!) हे वेगवेगळे आहेत, हे सत्य या आर्थिकदृष्ट्या निरक्षर भारताला समजणे अत्यावश्यक आहे! आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये भारताचे सकल राष्ट्रीय उत्पन्न सुमारे ₹३५०/- लाख कोटी एवढे असावे, असा अंदाज आहे. या सकल राष्ट्रीय उत्पन्नाचे ६% होतात ₹२१.६/- लाख कोटी! आपल्या अर्थसंकल्पातील शिक्षणाचा निधी आहे अवघा ₹१.४०/- लाख कोटी! साध्या भाषेत सांगायचे झाले तर जिथे शिक्षणासाठी एकवीस रुपये साठ पैसे एवढा निधी खर्च करायला हवा तिथे आपण फक्त एक रुपया चाळीस पैसे खर्च करीत आहोत! मग आपला देश शैक्षणिक स्तरावर पुढारलेला कसा होणार?

ज्यांना 'शिक्षणावर जीडीपीच्या ६% खर्च हवा' ही वस्तुस्थिती समजत नाही, त्यांना आपण अमेरिकेचे उदाहरण देऊ या. सुमारे ३५ कोटी लोकसंख्येच्या अमेरिकेत ४००० विद्यापीठे आहेत. आपल्या देशाची लोकसंख्या १४७ कोटी आहे, सोईसाठी आपण १४० कोटी गृहीत धरू या! १४० कोटी लोकसंख्येच्या आपल्या भारतातील विद्यापीठांची संख्या आहे फक्त १३३८! अमेरिकेचे प्रमाण लावले तर आपल्या देशातील विद्यापीठांची संख्या अमेरिकेच्या चार पट म्हणजे किमान १६,००० का नको ? आजच्या काळात एक विद्यापीठ स्थापन करायला सुमारे ₹३५०/- कोटी लागतात. विद्यापीठे स्थापन करण्यासाठी शासनाने दरवर्षी ₹१०/- लाख कोटी खर्च केले तरी सुमारे चौदा हजार विद्यापीठे स्थापन करायला आपणांस किमान पाच वर्षे लागतील ! चौदा हजार विद्यापीठांत प्राध्यापक, प्रशासक, टायपिस्ट्स, क्लार्क, शिपाई लागतील! तिथे आपल्या देशातील लाखो युवक - युवतींना सन्मानजनक रोजगार मिळेल! शासन 'असा' विचार का करीत नाही?

आपल्या देशातील शैक्षणिक गोंधळ व त्यांवरील प्राथमिक उपाय हे असे आहेत! सर्व जातीधर्माच्या व सर्व विचारसरणीच्या देशप्रेमी नागरीकांनी यांवर विचारविनिमय करायला हवा!

*...शुद्धोदन आहेर*

# सावरकरांविषयी ऐकावं ते एकेक नवलच -जगदीश काबरे

फोनिक्स अकॅडमी, वर्धा येथे १७ व्या विद्रोही साहित्य संमेलनात निरंजन टाकले यांनी जे भाषण केले होते त्या भाषणातील हे काही स्फ़ोटक आणि आगळेवेगळे मुद्दे...

१) सावरकर १९११ सली अंदमान जेलमध्ये गेले तेव्हा त्यांचं वजन होतं ११२ पौंड.

तेथील प्रचंड हालअपेष्टा सहन केल्यानंतर १९१४ साली त्यांचं वजन झालं १२६ पौंड!

म्हणजे प्रचंड हालअपेष्टा सहन करून अवघ्या तीन वर्षात १४ पौंड वजन वाढू शकतं, हा नवीन शोध सावरकरांच्या नावे लागला आहे.

२) सावरकरांनी कधीही भारत देशाला मातृभूमी म्हटले नाही. कारण ते नेहमी भारत देशाला पितृभू म्हणायचे. म्हणजे त्यांच्या दृष्टिकोनातून भारत कायमच पितृभूमी होती. मग प्रश्न पडतो की, 'ने मजसी ने परत मातृभूमीला' या काव्यामध्ये त्यांनी भारताला मातृभूमी कसे म्हटले? या मागची कहाणी वेगळीच आहे. खरे तर हे गीत देशभक्तीपर गीत नाहीच. १९०६ साली त्यांच्या मोठ्या भावाचा मुलगा वारला होता. त्यावेळेला त्यांनी वहिनीच्या सांत्वनासाठी एक विरह गीत म्हणून जे पाठवले होते ते होते... 'ने मजसी ने परत मातृभूमीला.' म्हणजे, ज्या भूमीवर मुलाच्या आईला भेटायला मला जायचे आहे तिथे मला ने, असा त्या ओळींचा अर्थ आहे. पण, सावरकर भक्तांनी त्याला देशप्रेमाचे लेबल लावून लोकांना उल्लू बनवले आणि सावरकरांचे उदात्तीकरण केले.

३) सावरकरांची विज्ञाननिष्ठासुद्धा वरवरचीच होती. ते खरे विज्ञाननिष्ठ नव्हतेच. कारण विज्ञाननिष्ठ माणूस कधीही कोणतेही धार्मिक कर्मकांड करत नाही की त्याचे समर्थनही करत नाही. पण सावरकरांनी परधर्मात गेलेल्यांना पुन्हा हिंदू धर्मात आणण्यासाठी अग्निहोत्रासारखा शुद्धीकरण यज्ञ निर्माण केला होता. अस्पृश्यांसाठी पतितपावन मंदिर बांधले होते. म्हणजे जे मुळातच पतीत आहेत ते त्या मंदिरात येऊन पावन होतील अशा अर्थाने. थोडक्यात, ते अस्पृश्यांना मुळात पतीतच समजत होते. ही कोणत्या विज्ञाननिष्ठेची लक्षणे आहेत?

४) मदनलाल धिंग्राला सावरकरांनी पिस्तूल दिले नव्हते. कारण त्याच्याकडे दोन पिस्तुलांचे आधीच लायसन्स होते. सावरकर जेव्हा धिंग्राना भेटायला गेले तेव्हा तो सावरकरांकडे तुच्छतेने पाहत म्हणाला, ''you are coward'', म्हणजे तुम्ही डरपोक आहात.

५) सावरकरांना पहिली शिक्षा झाली ती ते जिथे राहत होते तिथे येणाऱ्या मोलकरणीचा विनयभंग केला म्हणून.



६) सावरकरांनी जी दहा पिस्तुले हिंदुस्थानात पाठवली होती, ती जीवावर उदार होऊन घेऊन येणारा होता सिकंदर हयात खान, जो नंतर पंजाबचा मुख्यमंत्री झाला. पण याचे नाव सावरकरांनी आयुष्यात कधी घेतले नाही. हा सावरकरांचा कृतघ्नपणाच नाही तर काय?

७) सावरकरांनी जे दयायाचनेच्या भिकेचे अर्ज केले होते, त्यातील एका अर्जात त्यांनी स्पष्ट म्हटले होते की, मला जर तुम्ही सोडले तर तुम्ही म्हणाल तसे वागायला आणि करायला मी तयार आहे. भारतात हिंदू-मुस्लिम तेढ वाढविण्यासाठी मी तुम्हाला मदत करेन. लीनलिथीगो बरोबर त्यांनी स्वहस्ताक्षरात करार केला. त्यात त्यांनी लिहिले होते -ब्रिटिश साम्राज्य आणि हिंदू महासभा यांचा समान हेतू पूर्ण करण्यासाठी मी माझं पुढचं संपूर्ण आयुष्य गांधी, काँग्रेस आणि मुस्लिम यांचा विरोध करण्यासाठी खर्ची घालीन.

८) हिंदू महासभेचे अध्यक्ष झाल्यावर सावरकरांनी आमदाबादच्या अधिवेशनात पहिला ठराव मांडला की हिंदू आणि मुसलमान हे एक राष्ट्र असूच शकत नाहीत. थोडक्यात द्विराष्ट्र सिद्धांताचा ठराव पास केला.

९) जेव्हा सरदार वल्लभभाई पटेल भारत देशाच्या एकतेसाठी संस्थानाच्या विलीनीकरणाचे काम करत होते. त्याच वेळेला सावरकर मात्र त्या कामात खोडा घालण्याचे काम करत होते. त्रावणकोरचे दिवाण आय्यंगार यांनी त्रावणकोरला हिंदूराष्ट्र म्हणून घोषित केले, त्यावेळेस सावरकरांनी त्यांना पत्र पाठवून त्यांचे अभिनंदन केले. सरदार तारासिंग यांना पत्र लिहून सांगितले की, तुम्ही वेगळा शिखीस्थान देश निर्माण करा. मैसूरच्या राजाने तिरंगा फडकवणाऱ्यांना गोळ्या घातल्या तेव्हा त्यांचं अभिनंदन करणारं पत्र सावरकरांनी लिहिलं. राजा हरिसिंगांना त्यांनी पत्र लिहिले की, तुम्ही श्रीनगर वेगळं राष्ट्र घोषित करा, जम्मू वेगळं राष्ट्र घोषित करा. डोंगराना पत्र लिहिलं की लडाख स्वतंत्र राष्ट्र घोषित करा. अशाप्रकारे तोंडाने अखंड भारताचा जप करणारे सावरकर देशाचे खंड खंड तुकडे करायला प्रोत्साहन देत होते.

१०) दुसरं महायुद्ध सुरू झालं तेव्हा हिंदू महासभेने सैनिकीकरण करण्याचा घाट घातला. का तर म्हणे भारताच्या पूर्वोत्तर भागातून ब्रिटिश इंडियाला धोका आहे. तिथून कोण चढाई करणार होतं, तर सुभाषचंद्र बोस यांची आझाद हिंद सेना. ही सेना भारताला स्वातंत्र करण्याचा प्रयत्न करत होती. याचा अर्थ भारताच्या स्वातंत्र्यालाच नख लावण्याचे काम सावरकर करत होते.

११) सावरकर जेव्हा दादरमधील सावरकर सदनात रहायला आले. तेव्हा त्यांच्या बायकोची तब्येत तोळामासा होती. सावरकरांना भेटायला अनेक बायका यायच्या. त्यावेळेला पहिल्या माळ्यावर त्यांच्या बायकोला यायला बंदी होती. वर हसणे-खिदळणे चालू असायचे, तेव्हा हिची तगमग व्हायची. कारण सावरकरांनी तिच्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले होते.

१२) सावरकरांची बायको जेव्हा शेवटच्या आजारपणात रुग्णालयात होती तेव्हा ते तिला भेटायला गेले नाहीत. एवढेच काय पण ती मेल्यावरसुद्धा तिच्या मार्तिकालाही ते गेले नाही. त्यांनी त्यांचे अंगरक्षक आप्पा कासारांना सांगितले की, तूच जा आणि तूच सगळे सोपास्कार करून ये. फक्त येताना आठवणीने तिच्या हातातील सोन्याची अंगठी आणि बांगड्या तेवढ्या घेऊन ये. खरंच किती उच्च सुसंस्कृत होते ते!

या भाषणातील हे काही वानगीदाखल मुद्दे. पण त्यांचा खरा अवतार समजून घ्यायचा असेल तर हे भाषण पूर्णपणे ऐकायलाच हवे. निरंजन टकले यांनी या भाषणात प्रत्येक वेळी हे स्पष्ट केले आहे की, या सगळ्या गोष्टींचे त्यांच्याकडे लेखी पुरावे आहेत. तेव्हा सावरकरांच्या अंधअनुयायांची जर हिम्मत असेल तर निरंजन टकले यांच्यावर खटला दाखल करावाच. नाहीतर लाज वाटून शेपूट घालून बिळात लपावे.

*- सावरकरांचा खरा इतिहास समजून घ्यायचा असेल तर निरंजन टकले यांचा यासंदर्भातील व्हिडिओ जरूर पाहायला हवा...*

---

## सिंगारदान: एक वैचारिक संक्रमण ...पृष्ठ क्र. ५ वरुन

- घृणास्पद मजकुराने भरलेल्या रील्स आणि निर्लज्ज नृत्ये.
- अश्लील आणि अभद्र कॉमेडी शो.
- गोंगाटाने भरलेली अश्लील गाणी.
- कमी दर्जाच्या चित्रपटांच्या नावाखाली वाढले जाणारे पॉर्न.
- T.R.P. च्या नादात वाहिन्यांवर सामाजिक सलोखा बिघडवणारी भांडणे.

अभ्यासक्रमातील ती पुस्तकं, जी वाचून आजचा तरुण पिढी बरबाद होत आहे.

आणि सर्वात महत्त्वाचे सत्तेच्या लोभापायी रचलेले खोटे किल्ले आणि कथा, जे भारतीय संस्कृती, संस्कार आणि इतिहासाचा पाया उखडून टाकत आहेत.

आज आपण प्रत्येक क्षणी असाच एक 'सिंगारदान' (स्मार्टफोन) आपल्या हातात घेऊन फिरत आहोत आणि त्यालाच आपला जोडीदार, मार्गदर्शक मानत आहोत. त्यातून मिळणारे शब्द आणि विचार आपले आदर्श बनत आहेत. आपण तो कचरा आपल्या डोक्यात साठवत आहोत आणि मग आश्चर्य व्यक्त करतो की आमचा विचार का बदलत आहे?

जसे खराब अन्न शरीर खराब करते, तसाच खराब मजकूर (Content) बुद्धी पोखरतो. तरीही आपण तेच ऐकतो जे निरर्थक आहे, तेच पाहतो जे मनोरंजनाच्या नावाखाली आपल्या नसानसात अफू भरत आहे.

प्रश्न सरळ आहे: तुम्ही तुमच्या घरात काय आणत आहात आणि तुमच्या डोक्यात कोणाला जागा देत आहात? हा संक्रम णाचा काळ आहे. अन्नापासून विचारांपर्यंत सर्व काही संक्रमित झाले आहे. आता या देशाचे आणि संस्कृतीचे रक्षण केवळ ईश्वरच करू जा.

*- समाजमाध्यमातून साभार*

# (एका बड्या बहुराष्ट्रीय कंपनीच्या संदर्भात, कामगारांकडून विचारल्या गेलेल्या काही प्रश्नांची, मी व्हॉटसपवर पाठवलेली उत्तरं...आपल्याही माहितीसाठी संकलित करुन खालीलप्रमाणे पाठवतोय...जरा, वाचण्याची व समजून घेण्याची तसदी जरुर घ्या)

**प्रश्न क्र. १ : प्रस्तावित 'वेतन-वाढी'बद्दलचा....**

माझं उत्तर : ५ ते ८ टक्के पगारवाढ (ती देखील, तुमच्या छोट्या पगारावर...Small Base)...म्हणजे, जेमतेम महागाई दराशी तोंडमिळवणी कैली जातेय.

...तुमची संघटनात्मक ताकद, आपल्यातल्याच गद्दार-दलालांनी...उंदीर-घुशी जशा जमीन पोखरुन ठेवतात; तशी कमजोर करुन ठेवल्याने) न्यायालयीन दप्तरदिरंगाई, कितीही त्याज्य व अस्वस्थ करणारी असली; तरी, अखेरच्या निर्णयासाठी तुम्हाला त्यावर अवलंबून रहावं, तर लागेलच!

...अन्यथा, या उन्मत्त व्यवस्थापकांच्या कधिच तोंडाला फेस आणला असता आपण; पण, काय करणार?

**प्रश्न २ : घाईघाईने वारंवार बदलल्या जाणाऱ्या 'वेतन-संरचने''बाबतचा....**

माझं उत्तर : व्यवस्थापनाकडून पगाराच्या संरचना अशास्त्रीय स्वरुपात बदलण्याची चाललेली घाई, ही सगळी नुसतीच गंडवागंडवी नव्हे; तर, व्यवस्थापनाने एकूणच पगाराच्या संरचनेसंदर्भात, जो भयंकर पक्षपातीपणा करुन ठेवलाय (व्यवस्थापनाच्या मर्जीतल्या 'गुलाम' बनलेल्या लोकांवर मेहेरनजर व आपल्या सभासद कर्मचाऱ्यांवर मोठा अन्याय) त्या सगळ्या घोटाळ्याची झाकडाळ व सारवासारव आहे... ''खेळ आधी खेळायचा आणि नियम सोयिस्कर नंतर बनवायचे'', त्यातला बदमाषीचा प्रकार आहे.

त्यांना म्हणावं, पाश्चात्य प्रगत देशातील (उदा. यु.ए, अमेरिका, नॉर्डिक देश, द. कोरिया इ. इ.) तुमच्या शाखांमधल्या, पगार-संरचना दाखवा किंवा तुम्ही मेहनत व हुशारी दाखवून नेटवरुन वगैरे मिळवा...म्हणजे, सगळ्या बदमाषीचा आपसूक उलगडा होईल. मोठमोठे शब्द व बोजड संकल्पना वापरायच्या व सर्वसामान्यांना गोंधळून टाकायचं, हे शोषण व अन्याय करणाऱ्या भांडवली-व्यवस्थेचं कायम धोरण असतंच; त्यालाच, व्यवस्थापकीय-परिभाषेत 'If you cannot convince somebody... Confuse him!'' असं म्हणतात. बाकी, या सगळ्या दिशाभूल करणाऱ्या मांडणीला फारसा अर्थ नाही. जिथे कामगार-कर्मचारीवर्गाची ताकद कमजोर पडत जाते; तिथे असले विविध खेळ खेळले जातात (विशेषतः, IT कंपन्यांमधून), ज्यात शास्त्रीय-संरचनेचा (Scientific Structure) तार्किकतेचा (Rationality) पूर्ण अभाव असतो...आणि, आपल्या 'DKKM' सारख्या जाज्वल्य संघटनेपुढे ही व्यवस्थापकीय चलाखी-बदमाषी टिकू शकत नाही; म्हणूनच, तिला सगळी ताकद लाऊन, संबंधित व्यवस्थापकिय मंडळींकडून विरोध केला जात रहातो!

**प्रश्न ३ : न्यायालयीन निकालांना लागणाऱ्या बेमुदत दिरंगाईबाबतचा....**

माझं उत्तर : ''एखादा न्यायालयीन-निकाल पदरात पडला; म्हणजे, मग कामगारांमध्ये आशा व प्रेरणा सळसळेल आणि कामगार, दीर्घकालीन न्यायालयीन लढ्याला मानसिकदृष्ट्या अधिक सक्षम होतील'', हे अनेक ठिकाणच्या कामगार-कर्मचारीवर्गाचं म्हणणं समजून घेण्यासारखं असलं; तरी, वस्तुस्थिती आपल्या ठरल्या समजुतीशी बऱ्याचदा फारकत घेत फटकून रहात असते...आमचा अनेक कंपन्यांचा अनेक दशकांचा जळजळीत अनुभव, याला साक्षीदार आहे!

न्यायालयीन-निकाल, आज न उद्या हाती येणारच, ही काळ्या दगडावरची पांढरी रेघच! पण, कामगारांनी दीर्घकाळ वाट बघून थकून जावं, पिचून जावं...आणि, न्यायालयीन लढ्यापासून तुटून जावं; मात्र, कुठल्याही स्थितीत 'विद्रोही' (हल्लीच्या 'ढोंगी हिंदुत्ववाद्यां'च्या सरकारी-परिभाषेत 'शहरी नक्षलवादी') बनू नये...या एकमेव कुटील उद्देशाने, संपूर्ण कामगारविषयक न्यायालयीन-संरचना उभारलेली असते.

प्रथम गुन्हेगारी खटले, त्यानंतर दिवाणी दावे आणि सगळ्यात शेवटी कामगारांचे दावे... अशी न्यायालयीन दप्तरदिरंगाईची उभीआडवी संरचना, आपल्यासारख्या देशात असते; मात्र, पाश्चात्य देशांत असा 'भेदाभेद' आढळत नाही, हे तिथल्या गौरवास्पद न्यायालयीन व्यवस्थेचं व्यवच्छेदक लक्षणच! तिथे 'अनुचित कामगार-प्रथांविरोधात (Unfair Labour Practices) कंपन्यांना फार मोठे आर्थिक दंड केले जातात व प्रसंगी संबंधित व्यवस्थापकांना मोठा तुरुंगवास भोगावा लागतो!

**प्रश्न ४ : वेतन-संरचनेबाबतचं सरकारी-धोरणाबातचा....**

माझं उत्तर : एकतर किमान-वेतनापलिकडे (जे बेकार-भत्त्याच्याही लायकीचं नसतं) सरकारचं स्वतःचं असं, कॉर्पोरेट-क्षेत्रासाठी कुठलीही, कामगारांचं आर्थिक-कल्याण करणारं वा आर्थिक-उन्नयन साधणारं, वेतन-धोरण दुर्दैवाने नसतं...एवढंच काय, या संदर्भातील न्यायालयीन निकालांसाठी वापरले जाणारे 'निकष' देखील, तकलादू स्वरुपाचे व संबंधित युनियनवरच सगळ्या नोंदी (रेकॉर्ड्स) गोळा करण्याचं ओझं लादणारे असतात; जे वस्तुतः, काम खूपच अवघड व अपुरी संसाधने असलेल्या व कायद्यांचं पाठबळ नसलेल्या युनियन्सना, अगदी थकवणारे व नामोहरम करणारे असतात.

'वेतन-आयोग' (Pay Commissions), हे सरकारी-कर्मचाऱ्यांसाठी असतात; पण त्याबाबतही भाजप-संघीय सरकारच्या कारकिर्दीत, भविष्यकालीन परिस्थिती एकूणच अवघड दिसतेय.

'वेतन-सुधारणा समिती' (PRCs...Pay Revision Committees) या खास केंद्र-सरकारच्या विविध आस्थापनांसाठी (CPSEs...Central Public Sector Enterprises) नेमल्या जायच्या; पण, आता त्यांच्याही कार्यशैलीत, कार्यपद्धतीत व संरचनेत कामगार-कर्मचारीवर्गाच्या दृष्टीकोनातून खूपच 'घातकी' बदल, एकतर याआधीच करण्यात आलेत किंवा अजूनही केले डात आहेत (जे मी स्वतः, उत्पचच्या 'माझगाव डॉक' युनिटचा सखोल अभ्यास करताना सप्रमाण शोधून काढलं होतं... आजही वाईट एवढंच वाटतं की, जर ते माझगाव डॉकचे उतावीळ व अज्ञानी कामगार, कुणाकुणाच्या चिथावणी व दबावामुळे आपल्या DKKM युनियनला अचानक सोडून गेले नसते; तर, एव्हाना प्रत्येक कामगाराला, अगोदरच्या १५-२० वर्षांच्या सेवेतील वेतन-फरकाची सव्याज रक्कम म्हणून किमान १ कोटीहून अधिक रक्कम दरडोई नक्कीच मिळाली असती; एवढी त्यांची अनेक वर्षे पगारात प्रचंड फसवणूक व लूट होत आली होती...मागाहून पस्तावून व माझ्या हातापाया पडून, काय उपयोग? न्यायालयीन-लढा अर्धवटच सोडला त्या महामूर्ख कामगारांनी आणि आज अनेकांची स्थिती आहे की, अपुऱ्या पगाराने त्यांना 'अविवाहित' तर, रहावं लागतंच आहे; शिवाय नोकरी टिकण्याची शाश्वती अजिबात नाहीच)...

**प्रश्न ५ : परिस्थितीतून मार्ग काढण्याचे पर्याय**

माझं उत्तर : ...ज्याक्षणी (आज, उद्या किंवा भविष्यात), संबंधित कर्मचाऱ्यांचा 'कामगारधर्म' खऱ्या अर्थाने जागा होईल आणि सगळी मरगळ, सगळी गांडुगिरी व गुलामीवृत्ती सोडून ते आरपारच्या लढ्याला दंड थोपटून एकजुटीने उभे रहातील... तेव्हा, तो लढा अंतिम व निर्णायक स्वरुपाचा असेल; अशा जातिवंत-जाज्वल्य संघर्षाला, न्यायालयीन लढा केवळ 'पूरक' ठरेल...मुख्य लढा, रस्त्यावरचाच राहील आणि त्यावेळेस माजोर्या, उन्मत्त व अत्याचारी व्यवस्थापकिय मंडळींच्या नाकात वेसण व गळ्यात पट्टे घालून त्यांना आपण खात्रीने रस्तोरस्ती फिरवू, जय हो!

...ही केवळ, कुठली 'कविकल्पना' नव्हे; ''अति झालं की, माती होते'' या उक्तिनुसार, गवताला भाले फुटताना, आम्ही अनेक संघर्षात गेली ४० वर्षे पहात आलोयत... कुठलाही संघर्ष, या सगळ्या अनुभवविश्वाला 'अपवाद' कसा असेल?

**प्रश्न ६ : CTC (Cost To the Company) बाबतचा....**

माझं उत्तर : ...लक्षात ठेवा, CTC ही तद्दन फसवी व्यवस्थापकिय संकल्पना आहे!

जसे आपल्याला बिल्डर्स, Carpet Area (ज्या चटईक्षेत्रावर आ''पणं खरंतरं वावरतो, वावरु शकतो) ऐवजी, Built up, Super Built up, Supra Built up वगैरे 'डोकेबाज व धोकेबाज' संकल्पना प्रसवून व पसरवून फसवतात...त्याच श्रेणीतील, ही व्यवस्थापकिय फसवणूक आहे...त्यावर, धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचं (DKKM) कायम प्रतिपादन राहिलेलं आहे की, आम्हाला CTC ही, एक प्रकारची 'चहा पावडर' आहे, एवढंच माहिती आहे, बस्स्!

जो पगार महीनाअखेर थेट हाती येतो व संसारखर्चाच्या कामी येतो...तोच खरा पगार. थोडक्यात, वर्षभरात संसारासाठी लागणारी मोठ्या किंवा भांडवली खर्चाची रक्कम (वार्षिक-बोनस वगैरे) देखील पगाराला जोडून पगार खोटा फुगवणं आणि निवृत्तीनंतरच्या 'आधाराची काठी' (PF, Gratuity इ.) तरुणपणीच मोडून टाकणं; ही व्यवस्थापकिय डँबिसगिरी म्हणजेच, CTC.. !!!

***...राजन राजे***
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष व धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ)

# लंपट ज्योतिषाचा राजकीय झंटा-फंटा

''दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए'' हे नाशिकचा लिंगपिसाट ज्योतिषी कॅप्टन अशोक खरात प्रकरणाने पुन्हा दाखवून दिलंय. अशाच्या बदकर्मी धंद्याचं मार्केटिंग ''महाराष्ट्र राज्य महिला आयोग''च्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी करावं, ह्यात धक्कादायक काही नाही. ही युतीदेखील नवी नाही.

थोर कवयित्री बहिणाबाई चौधरी (जन्म : २४ ऑगस्ट १८८०; निधन : ३ डिसेंबर १९५१) ह्या निरक्षर होत्या. पण त्यांच्याकडे अद्भुत प्रतिभा, मर्मभेदी दृष्टी आणि विलक्षण समाजभान होतं. म्हणूनच त्यांनी ठणकावून सांगितलंय -

*नको नको रे ज्योतिषा।*
*माझ्या दारी नको येऊ।*
*माझे दैव मला कळे।*
*माझा हात नको पाहू।।१*
*म्हणे नशिबाचे नऊ ग्रह।*
*तळहाताच्या रेघोट्या।*
*बापा नको मारू थापा।*
*अशा उगा खऱ्या खोट्या।।२*

अशा खणखणीत शब्दांत बहिणाबाईंनी दारी आलेल्या ज्योतिष्याला हाकललंय. याउलट, ज्याला महिला लैंगिक शोषणाच्या प्रकरणात त्या कॅप्टन अशोक खरात ह्या ज्योतिष्याला नाशिक पोलिसांनी अटक केलं; त्याच्या दारी सुशिक्षित, मान्यवर मंडळी जायची. त्याच्या दर्शन-मार्गदर्शनासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राधाकृष्ण विखे, दादा भुसे यांच्यासह आठ मंत्री नाशिकला अशोक खरातच्या मंदिर-आश्रमात जायचे. त्याच्या डोक्यावर छत्री धरलेले ''राज्य महिला आयोग'' अध्यक्ष रुपाली चाकणकर आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या भेटीचे फोटो ''सोशल मीडिया''तून व्हायरल झाले आहेत. ह्या नराधमाला अटक करताना पोलिसांनी जे पेनड्राइव्ह जप्त केले; त्यात ५८ महिलांच्या लैंगिक शोषणाचा मुद्देमाल सापडलाय. तोही त्याचा ''ऑफिस बॉय'' संशयित नीरज जाधव ह्याने पैशाच्या लालसेपायी अशोक खरातला ब्लॅकमेलिंग (५ कोटी रुपये) केल्याने उघड्यावर आलाय.

त्र्यंबकेश्वर-नाशिक येथे दर १२ वर्षांनी होणाऱ्या ''सिंहस्थ'' कुंभमेळ्याला ३१ ऑक्टोबर-२०२६ पासून प्रारंभ होत आहे. हा कुंभमेळा ४५ अमृत (शाही) स्नानांसह दीड वर्ष चालेल. त्यातील भोंदूगिरीचा हा भयानक ''ट्रीझर'' ज्योतिषी अशोक खरात आणि पारनेर (जिल्हा : अहिल्यानगर) येथील १८ वर्षांच्या मुलीला तिच्या आई-वडिलांचा, भावाचा खून करण्याची धमकी देऊन गेली ५ वर्षे लैंगिक अत्याचार करणाऱ्या वारकरी बुवा हभप अण्णा गुंजाळ ह्या कीर्तनकाराने दाखवला आहे. स्वतःला संत, महंत, साधू, बुवा-महाराज आणि ज्योतिषी म्हणून घेणारी ही मंडळी एकाच माळेचे मणी आहेत. ह्या साऱ्यांचीच छिनाल छाप वेद, उपनिषद आणि पुराण कथांवर असते. सापडत नाहीत, तोपर्यंत हे ''संधिसाधू''च असतात. हे तांदळातल्या खड्यांसारखे आहे. हे खडे निवडेपर्यंत तांदळाच्या पोत्यात तांदूळ म्हणूनच असतात.

असाच ज्योतिषी अशोक खरात होता. तो स्वतःला



''अंकशास्त्रज्ञ'' (न्यूमरोलॉजिस्ट) आणि 'कॅप्टन' म्हणवून घ्यायचा. ''मर्चंट नेव्ही''मधून अधिकारी म्हणून आपण निवृत्त झाल्याचे सांगायचा. ह्या खोट्या ओळखीचा वापर करून त्याने स्वतःला बड्या राजकीय नेत्यांशी जोडून लोकांचा विश्वास संपादन केला होता. हा भोंदूगिरीचा ''झंटा'' आणि त्यात ''मी कृष्ण, तू राधा'' म्हणत होणारा महिलांच्या लैंगिक शोषणाचा ''फंटा'' नवा नाही. (हे ''झंटा-फंटा'' शब्द बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्या प्रकरणात ''भाजप'' आमदार सुरेश धस यांनी जोरदारपणे वापरले होते.)

आठ वर्षांपूर्वी अमरावतीतील पूर्णा नदीकाठच्या नृसिंह मठाचा प्रमुख ''बालयोगी ब्रह्मचारी महाराज'' (मूळनाव : मुरलीधर तायडे) सेक्स-सीडीमध्ये सापडला होता. त्याने बाथरूममचा ''भोगखाना'' बनवला होता. अशा ''लिंगपिसाट'' महाराजांपैकी कोल्हापूरचा तोडकर महाराज रंगेहाथ पब्लिकच्या तावडीत सापडला होता. (जानेवारी-२००५) शिवलिंग महादेव तोडकर हा ''महाराष्ट्र राज्य वीज महामंडळ'' (एमएसईबी)मध्ये कारकून होता. त्याची भविष्य कथनाची पद्धत अंकाशास्त्राशी संबंधित नसली तरी आकड्यांशी होती. त्याच्या येणाऱ्या गिऱ्हाईकाने जन्मकुंडली स्वतःच्या हातात ठेवायची. त्याला तोडकर महाराज एक संख्या मनात धरण्यास सांगे. ती धरल्याचे गिऱ्हाईकाने सांगितले की, तोडकर महाराज त्या संख्येतून १७ वजा करण्यास सांगायचा. त्यानंतर येणाऱ्या संख्येला ९ ने गुणायचे. जो गुणाकार यायचा; तो आकडा गिऱ्हाईकाने सांगताच, तोडकर महाराज म्हणायचा, ''तीच तुझी जन्मतारीख!'' अशाच प्रकारे मुंबईतील कुर्ला येथील कर्वे गुरुजी आणि त्यांची मुलगी पिंकी, हे केवळ चेहरा पाहून भविष्य विचारायला येणाऱ्याची जन्मतारीख सांगत. अर्थात, ही पहिल्याच झटक्यात गिऱ्हाईक पक्के करण्याची ट्रिक होती. ह्या जोरावर तोडकर महाराजने प्रचंड माया जमवली. वीज मंडळाच्या कारकुनाला ज्योतिष विचारायला वीजमंत्री यायचा.

कोल्हापुरात कोणी बडा राजकीय नेता, कलावंत, प्रशासकीय अधिकारी आला की, त्यांना महाराजांचे चमचे-नमते महाराजांच्या सिद्धी-चमत्काराच्या करामती ऐकवून त्यास गंजीमाळ परिसरातील ''द्रोणागिरी'' आश्रमात नेत. त्यापैकी काहींना तोडकर पदव्या-उपाध्या देऊन आपले करीत. अशाप्रकारे गळाला लागलेले भक्त तोडकर महाराजाला आपल्या संस्था-संघटनेच्या कार्यक्रमासाठी मुंबई-पुण्याला नेत. त्यावेळी महाराजांबरोबर विमानातून जाण्यासाठी बड्या-श्रीमंत भक्तांमध्ये चढाओढ लागायची. या साऱ्या बनावामुळे तोडकर महाराज कोल्हापूरच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवनाचे मानचिन्ह झाला होता. परंतु, वसई-भाईंदर येथून भविष्य समजून घेण्यासाठी कोल्हापुरात आलेल्या दोन तरुणींनी आश्रमातल्या ''खास खोली''तील तोडकर महाराजाचे अश्लील उद्योग जगजाहीर केले. त्याची पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली. त्यातून कोल्हापुरात तोडकर महाराजाविरोधात लोकांदोलन उभे राहिलं. पोलीस त्याला जामिनासाठी कोर्टात नेत असताना, लोकांनी चपलेनं बडवलं. ब्रह्मचारी हनुमंताच्या आडोशाने लैंगिक खेळ खेळणाऱ्या तोडकर महाराजचं थोबाड हुप्प्या वानर दिसावा, इतकं सुजवलं. त्याच्या केसचा निकाल तो मरेपर्यंत (५ फेब्रुवारी-२०१५) लागला नाही. त्याचा मात्र आश्रम अजूनही आहे.

१९९१ मध्ये नागपुरातील एका भक्ताच्या मुलीवर बलात्कार करणारा कृपाळू महाराज, त्या गुन्ह्याबद्दल ७ वर्षांची शिक्षा भोगून तुरुंगातून बाहेर आला आणि ''आस्था'' आणि ''संस्कार'' टीव्ही चॅनलवरून प्रवचनं देऊ लागला. अंगावर जिवंत साप घेऊन ''नागीन डान्स''साठी प्रसिद्ध असणाऱ्या स्वामी भीमानंद ह्याला प्रवचनाला येणाऱ्या मुलींना ''सेक्स रॅकेट''मध्ये फसवल्याच्या आरोपाखाली (२०१० मध्ये) अटक झाली होती. बंगळूरचा स्वामी नित्यानंद यालाही तमिळ अभिनेत्री बरोबरचा सेक्स व्हिडिओ ''लीक'' केला म्हणून पोलिसांनी अटक केली होती. अशाचप्रकारे दोन मुलींवर बलात्कार केल्याच्या आरोपाखाली आसाराम बापू जेलबंद झाला. (२०१३) सोबत, त्याचा मुलगा नारायण साई हादेखील सुरतमधील दोन मुलींवर (दोघी बहिणी होत्या.) बलात्कार केल्याच्या आरोपाखाली जेलबंद झाला. तरीही आसाराम बापूच्या देशभरातील शेकडो आश्रमांपैकी एकाचीही वीट हलली नाही. ह्या नाकर्तेपणाची पैदास ''जे जे होईल, ते पहावे; चर्चा करावी आणि गप्प बसावे,'' या सामाजिक षंढपणातून झाली आहे.

३५ वर्षांपूर्वी धुळ्याचे भास्कर वाघ प्रकरण गाजलं होतं. तोही तोडकर महाराजांसारखा सरकारी कारकून होता. त्याने महाराज बनून सरकारी तिजोरीतील १४ कोटी रुपये लंपास केले होते. विशेष म्हणजे, तेव्हा भ्रष्टाचारविरोधी प्रशासकीय अधिकारी (IS) अशी ख्याती असलेले सदाशिवराव तिनईकर हे ह्या लफंग्या महाराजांचे भक्त होते. असा इतिहास असेल, तर नटण्या-दिसण्यासाठीच अधिक प्रसिद्ध असणाऱ्या रुपाली चाकणकर आणि ज्योतिषी अशोक खरात ह्यांच्या कनेक्शनचे काय घेऊन बसलात! तरीही, कथित ज्योतिषी कॅप्टन अशोक खरात यांच्या प्रकरणाला वाचा फुटल्यावर ''महाराष्ट्र राज्य महिला आयोग''च्या अध्यक्ष रुपाली चाकणकर ह्यांचे नाव विशेष चर्चेला आलं. त्यांच्या राजीनाम्याची मागणी होऊ लागली. कारण रुपाली चाकणकर यांनी ''गुरुमाऊली'' मानलेल्या खरात ह्याचे कारनामे महिलांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित आहेत.

''सोशल मीडिया''वर प्रसारित झालेल्या एका व्हिडिओमध्ये रुपाली चाकणकर नराधम खरातचा गौरव करताना म्हणतात, ''आईने मला जन्म दिला म्हणून, आई माझी गुरू! वडिलांनी मला शिक्षणाची योग्य संधी दिली,



म्हणून ते माझे गुरू! पण मी कोण? माझा जन्म कशासाठी आहे? मी काय काम केलं पाहिजे? ह्याचं मार्गदर्शन अशोक खरात यांनी केल्याने, माझं सारं अस्तित्व हे गुरुमाऊली हेच आहेत!'' आपल्या ह्या अंधभक्तीमुळे शेकडो मुली-महिलांचे आयुष्य उद्ध्वस्त झालीत, ह्याचे भान चाकणकर बाईंना आता तरी आले आहे का? ''लोक अशांकडे श्रद्धेने जातात. तशाच प्रकारे रुपाली चाकणकर गेल्या असतील,'' अशी सारवासारव नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी केलीय. ती खोटी आहे. संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात -

*एथ वडील जें जें करिती।*
*तया नाम धर्मु ठेविती।*
*तेंचि येर अनुष्ठिती ।*
*सामान्य सकळ।।*
*(ज्ञानेश्वरी, अध्याय ३, ओवी १५८)*

अर्थात, ''थोर लोक (नामवंत, मान्यवर) जे कर्म आचरतात; त्यालाच सामान्य लोक ''धर्म'' म्हणत त्याचे आचरण करतात.'' ह्यातून मान्यवर, सेलिब्रिटी, शासक, प्रशासक ह्याचं आचरण/वर्तन कसे आणि कोणत्या प्रतीचे असावे, ते सांगितले आहे. ह्या अपेक्षेस पात्र नसल्याचे रुपाली चाकणकर यांनी डॉ. संपदा मुंडे आणि वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात यापूर्वीच दाखवून दिलेय. आता तर त्यांची अंधभक्ती ही बोगस कॅप्टन व लंपट ज्योतिषी असलेल्या अशोक खरात याच्या बदकर्मी उद्योगाची मार्केटिंग करणारी ठरलीय. अशोक खरातच्या शिष्या आणि त्याच्या ''श्री शिवालिक संस्था''च्या विश्वस्त असलेल्या रुपाली चाकणकर आता पीडित महिलांना कोणत्या तोंडाने काय न्याय देणार? आणि भटभिक्षुकांच्या पौरोहित्याप्रमाणेच ज्योतिषाला शैक्षणिक दर्जा देणारे सरकार कोणत्या तोंडाने अशोक खरातला शिक्षा करणार? चाकणकर बाईंनी ''राज्य महिला आयोग'' अध्यक्ष पदाचा राजीनामा दिलाय. हे ज्योतिषाच्या भाषेत गंडांतर असले तरी प्रत्यक्षात ते बदकर्माच्या साथीदारीचे फळ आहे.

ज्योतिष किंवा भविष्यकथन हे थोतांड असल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे. २० दिवसांपूर्वी इस्राएल-इराण युद्ध सुरू झालंय. त्याच वेळी दुबईत ज्योतिष्यांची परिषद होती. युद्धामुळे आखातातील विमान वाहतूक थांबल्याने ज्योतिषी दुबईत अडकून पडले. तिथल्या युद्धजन्य परिस्थितीतून सुटका करून घेण्यासाठी प्रत्येक ज्योतिषी आपल्या देशाच्या-राज्याच्या शासक-प्रशासकांकडे मदतीसाठी फोन करू लागला. यातून, ''ज्यांना आपल्या भविष्यात काय वाढून ठेवले ते समजत नाही; ते इतरांचे भविष्य काय सांगणार,'' असा प्रश्न निर्माण झाला. अशीच हालत आता चाकणकरबाईंच्या ''गुरुमाऊली''ची झालीय. तरीही त्या ''ज्योतिष - भविष्य कथन हे थोतांड आहे,'' अशी कबुली देण्याची शक्यता नाही. कारण, पाच वर्षांपूर्वी (जानेवारी २०२१) ज्योतिष शास्त्राला शैक्षणिक प्रतिष्ठा देण्याचा निर्णय ''मोदी सरकार''ने घेतलाय. त्यानुसार, 'केंद्र सरकार'च्या अखत्यारितील 'इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ'ने (IGNOU-इग्नू) ज्योतिषशास्त्राची 'मास्टर्स डिग्री' (MA) देणारा दोन वर्षांचा अभ्यासक्रम सुरू केलाय. त्यात ज्योतिषशास्त्राच्या विविध शाखांबाबतचं व्यावहारिक शिक्षण विद्यार्थ्यांना दिलं जातं. ह्या निर्णयास, ''ज्योतिषशास्त्र हे अवैज्ञानिक असल्याने हा अभ्यासक्रम रद्द करावा,'' अशी मागणी विज्ञान प्रचार-प्रसाराचं काम करणाऱ्या संस्था-संघटनांनी केली. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या ''महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती''ने तेव्हा प्रसिद्ध केलेल्या पत्रकातून म्हटले होते की, ''ज्योतिष या विषयाला कोणताही शास्त्रीय आधार नाही. ते 'छद्म विज्ञान' आहे. ग्रह-ताऱ्यांचा शास्त्रीय अभ्यास करणाऱ्या विज्ञान शाखेला 'खगोलशास्त्र' म्हणतात. त्या शास्त्राच्या उपलब्ध अभ्यासानुसार, आकाशातल्या ग्रह-ताऱ्यांचा मानवी जीवनावर कोणताही प्रभाव पडत नाही; परिणाम होत नाही. त्यामुळे अशा संपूर्ण अशास्त्रीय गोष्टींचे प्रशिक्षण देण्याचा दावा करणारा 'ज्योतिष' अभ्यासक्रम रद्द करावा!'' ही त्यांची मागणी योग्य आणि विज्ञान प्रसाराचा आग्रह धरणाऱ्या 'भारतीय संविधान'ला धरून होती. पण त्याची सरकारी पातळीवर दखल घेतली नाही.

अशाच प्रकारचा ज्योतिषशास्त्राचा अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय २००१ मध्ये 'भाजप आघाडी' (NDA) च्या 'वाजपेयी सरकार'नेही घेतला होता. त्याला मोठ्या प्रमाणात विरोध झाल्याने तो रद्द करण्यात आला. हा विरोध करणाऱ्यांमध्ये ज्येष्ठ खगोल वैज्ञानिक डॉ. जयंत नारळीकर यांचाही समावेश होता. भारतीय वंशाचे 'नोबेल' पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ व्ही.के. वेंकटरामन यांनी ज्योतिषशास्त्राची तुलना 'छद्म' विज्ञानाशी (स्यूडोसायन्स) केलीय. 'छद्म' विज्ञान म्हणजे, विज्ञानासारखी मांडणी करून केलेली फसवणूक! ह्यात ज्योतिषशास्त्र 'क्रमांक एक' वर आहे; आणि ते विविध प्रकारे जगभर आहे. ह्या साऱ्यांचा उद्योग आकाशातल्या ग्रह-ताऱ्यांवर असतो. त्यातही भारतीय ज्योतिष्यांनी आपली उंची वाढवण्यासाठी त्याला ''भटी शेंडी'' लावल्याने आकाशात नसलेले 'राहू-केतू' हे काल्पनिक ग्रह जन्मकुंडलीत आणले आहेत. ते 'कालसर्पयोग' बनून (ज्याची जन्मकुंडली तयार केली आहे त्या-) जातकाला 'नारायण-नागबळी' विधीसाठीचं 'गिऱ्हाईक' बनवतात.

याशिवाय, शनीची साडेसाती, २२ कोटी किलोमीटर दूरवर असलेल्या मंगळाची 'कडक' बाधा, हातावरच्या गुरू-बुध-शुक्राचा दुबळेपणा दाखवणाऱ्या रेषा-चिन्हं-उंचवटे जाळ्या आहेत. शुभ-अशुभ दिवसाचे, मुहूर्ताचे खूळ आहे. वास्तुशास्त्र, 'नाडी' माहात्म्य, जपजाप्य-मंत्रमाहात्म्य यांचे उपाय-तोडगेही आहेत. ह्या साऱ्या बनावट उद्योगांसाठी 'मास्टर ऑफ आर्ट' ज्योतिषी बनवून 'मोदी सरकार' लोकांनी कष्टाने कमावलेल्या पैशांवर हात मारणारे खिसेकापू आणि दरोडेखोर तयार केलेत; तसेच स्त्रियांची अब्रू लुटणारेही तयार केलेत; त्यांना प्रतिष्ठा दिलीय; हे अशोक खरातच्या प्रकरणावरून स्पष्ट होते.

छत्रपती शिवरायांच्या आणि राजमाता जिजाऊंच्या चरित्राची नटव्या-नाटकी शब्दांत विटंबना करणाऱ्या कथित 'शिवशाहीर' ब. मो. पुरंदरेंना 'महाराष्ट्रभूषण पुरस्कार' देऊन 'फडणवीस सरकार'ने त्याच्या नालायकीला 'सरकारमान्य' केले. तोच प्रकार 'मोदी सरकार'ने राष्ट्रीय विद्यापीठातून ज्योतिषशास्त्राचा 'मास्टर डिग्री'चा अभ्यास राबवून नकली विज्ञानाला 'सरकार मान्यता' देऊन केला आहे. २,००० कोटी रुपये खर्चून तयार केलेलं भारताचे चांद्रयान चंद्रावर पोहोचले नाही. ''ते पोहोचणार नाही,'' असे भाकीत देशातील एकही ज्योतिषी करू शकला नाही. तिथे 'मोदी सरकार'ने तयार केलेले 'मास्टर्स' ज्योतिषी लोकांच्या कुंडल्या मांडून, हस्तरेषा पाहून त्यांच्यावर आकाशातल्या ग्रह-ताऱ्यांचा प्रभाव किती पडतो, ह्याचा काय डोंबलाचा अभ्यास करणार आणि त्यांचे भविष्य सांगणार?

आई-वडील, पूर्वजांचे गुण-दोष अपत्यात उतरतात. तसे, ''चंद्रसूर्यादि ग्रहांवरून येणाऱ्या लहरींचे ठसे गर्भातून बाहेर येताना अर्भकाच्या मृदू शरीरावर उमटतात आणि त्याच्यात काही शारीरिक व बौद्धिक दोष जन्मत:च निर्माण करतात!'' ह्या गृहीतकावर ज्योतिषशास्त्राचा डोलारा उभा आहे. परंतु, चंद्रसूर्यादी ग्रह-ताऱ्यांच्या प्रकाश-लहरींचा कोणताही परिणाम अर्भकावर होत नाही, हे विज्ञानाने सिद्ध केलंय. कारण सूर्याचा प्रकाश आपणापर्यंत आठ मिनिटांनंतर पोहोचतो. इतर ग्रह-ताऱ्यांच्या प्रकाश-लहरी आपणापर्यंत पोहोचण्यास शेकडो वर्षं लागतात. अशा परिस्थितीत ग्रह-ताऱ्यांचे प्रभाव-परिणाम मानवी जीवनावर कसे होणार? ते होत नाहीत, हे इयत्ता आठवीच्या पुस्तकात शिकवायचे आणि 'एमए'ला त्याच्या उलटे शिकवायचे, हा 'मोदी सरकार' पुरस्कृत उफराटेपणा आहे. त्यासाठी ज्योतिषशास्त्राचा 'देशी बाणा' दाखवला जातो; तोही खोटा आहे. कारण १२ राशी आणि जन्मकुंडलीतल्या १२ घरांत लोकांना 'गिऱ्हाईक' बनवणारं ज्योतिषशास्त्र हे 'भारतीय' नाही. १२ राशी ही ...पृष्ठ क्र. ११

## कोण कामगार,तर कर्मचारी कोणी

आज अन् उद्या, गरज लागणार तुझीच जशी काल होती.....
रंग कपड्यांचा, भले असो निळा वा पांढरा रंगीत,
भांडवलदारा लेखी, नोकरच सारे नोकरीत.
गुलामगिरी मोडून काढण्यासाठी रहा सदैव संघटित...:
कायमस्वरूपी नोकऱ्यांना लागला आता आजार.
कंत्राटीकरणातून भरला पुन्हा गुलामांचा बाजार.
हा धंदा लुटारू दलालांचा कामगार, कर्मचारी पुरता बेजार.:.
कामगार संहिता लागू नव्याने बदलून कामगार कायदे,
निपचीत पडल्या एकट्या जीवा जशी टोचून खाती गिधाडे,
सावधान मृगजळापासून तेंव्हा, ठेऊन डोळे सताड उघडे......

*निरंजन म्हात्रे...*

---

## कामगार तू ....

का मग गार तू ?
विसरलास कामगारधर्माचा सार तू.....?
कारखान्याची गरज तू
संपत्तीचा निर्माता, राष्ट्राचा आधार तू,
कोणी पत्यातला गुलाम नाही हुकूमाचा एक्का तू.......
अंध नाही पण बेधुंद तू,
हातचं सोडून पळत्याच्या पाठी तू,
बेलगाम मन तुझे,का बेसावध तू.......
कुठे लाचार तू, कुठे गद्दार तू
कुठे मग्न एकमेकांवर कुरघोड्या करण्यात तू,
आभासी विश्वात, अनैतिकतेच्या ग्लानीत तू.....
उत्सवाच्या गराड्यात तू,
5G, मोबाईलच्या भोवऱ्यात तू,
निद्राधीन इतका, काळ्या कामगार संहितेच्या चक्रव्यूहात तू ......
जर तुझ्या जीवनाचा शिल्पकार तू,
चल उठ तु, कर एल्गार तू,
भांडवलदारी, कंत्राटी दुष्टचक्रावर कर प्रहार तू,
कामगार ऐक्याचा मे दिनी कर पुकार तू.......

*निरंजन म्हात्रे*

---

***"... कुठे, 'स्ट्रक्चरल इंजिनियर' असलेला व सत्तेवर येताच १५ दिवसात भ्रष्टाचाराविरोधात कडक पावलं टाकणारा, सार्वजनिक शिक्षणाचा दर्जा वाढवणारा आणि स्विसबँकांमधला राजकारणी, सरकारी अधिकारी, उद्योगपतींचा 'नेपाळी काळा पैसा' देशात परत आणण्यासाठी खंबीर व सत्वर पावलं टाकणारा...नवा नेपाळी पंतप्रधान 'बालेन शाह'... आणि कुठे, चौथी पास; तसेच, "युद्ध-गुन्हेगार व भ्रष्टाचाराच्या आरोपांखाली तुरुंगवासाची शिक्षा घोषित झालेल्या नृशंस इस्रायली पंतप्रधान 'नेतन्याहू'ची गळाभेट घेण्यात धन्यता मानणारा... 'विश्वगुरु' नव्हे (सध्या अंधभक्तांनी पाकिस्तानच्या पंतप्रधानांना 'विश्वगुरु' घोषित करायला हवं, एवढी शोचनीय अवस्था आहे); तर, 'इराण'ऐवजी आपल्या देशातल्या गटारांतून स्वयंपाकाचा गॅस पैदा करणारा आमचा 'विदूषक' पंतप्रधान...???"*_***

***"... कुठे, 'बालेन शाह' सरकार आणि कुठे, स्विसबँकातला भारतीय काळा पैसा, दरडोई १५ लाख रुपये वाटण्याची 'जुमलेबाजी' करणारं; तसेच, निवडणूक कधिही न हारण्यासाठी EVM / SIR च्या झोलबाजीसह...नोटबंदी / इलेक्टोरल-बॉण्ड्स / PM Care Fund वगैरे घोटाळे दडपून ठेवणारं 'मोदी-शाह' सरकार...???"***

***...राजन राजे (अध्यक्ष: धर्मराज्य पक्ष)***

---

**सर्वाधिक महत्त्वाची गोष्ट तुमच्या लक्षात आली का?**

**रामायणातल्या कुंभकर्णानंतर सगळ्यात जास्त झोपलेला जर कोणी असेल;**

**तर, तो म्हणजे ह्या महाराष्ट्रातला मराठी माणूसच !**

**"हिंदुराष्ट्राच्या प्रचारकी-घातकी राजकारणात महाराष्ट्राची लालकाळी माती, मराठी-माणसाच्या चिमटीतून निसटत चाललीय; तरीही आपण साखर झोपेतच...!!!"**

**- रुद्रेश सातपुते**

---

## लंपट ज्योतिषाचा राजकीय झंटा–फंटा ...पृष्ठ क्र. १० वरुन

वर 'ग्रीक कालगणना' पद्धत आहे. 'भारतीय कालगणना' ही २७ नक्षत्रांवर आधारित आहे.

राशीला आलेल्या ग्रहांचा इष्ट–अनिष्ट परिणाम अनिवार्य किंवा अटळ असतो; असे ज्योतिषीही मान्य करीत नाही. तसा इतिहास नाही. तरीही भय, अज्ञान, अगतिकता यामुळे लोक ज्योतिष्यांचे 'गिर्हाईक' बनतात. अरिष्ट टाळण्यासाठी, ग्रहशांती करण्यासाठी तोडगे–विधी करतात. थोरले माधवराव पेशवे यांना क्षयरोगाने मृत्यूच्या दाढेत लोटले. त्यातून त्यांची सुटका करण्यासाठी 'मृत्युंजय' मंत्राचा गजर अखंड चालू ठेवण्यासाठी शेकडो ब्राह्मण नियुक्त केले होते. तरीही, त्यांच्या मंत्रजागराला न जुमानता मृत्यूने माधवरावांना ओढून नेले!

दुसरे महायुद्ध गाजवणारा जर्मनीचा 'हुकूमशहा' हिटलर ह्याचा ज्योतिषावर नितांत विश्वास होता. त्याने आपल्या दिमतीला पाच प्रख्यात 'ज्योतिर्भास्कर' बाळगले होते. त्यापैकी एकाला (त्याला स्वत:चेच भविष्य न समजल्यामुळे) इंग्लंडच्या हेरांनी पळवून नेले. उरलेले चौघे हिटलरला सल्ला देण्यास तत्पर होते. पण त्यांच्या सल्ल्याचा काडीमात्र उपयोग झाला नसल्याचे इतिहास सांगतो. आपला संपूर्ण पराभव होऊन शत्रूच्या हातात सापडण्याची नामुष्की टळावी, यासाठी हिटलरने स्वहस्ते स्वत:ला भडाग्नी दिला. हा निर्घृण प्रकार टाळण्यासाठी ग्रहांची अनुकूल स्थिती मिळवण्यात ज्योतिष्यांना यश लाभले नाही. चौघांपैकी एका ज्योतिष्याला तर हिटलरच्याच 'कॉन्सन्ट्रेशन कॅम्प'मध्ये मृत्यू आला. हिटलरचा विश्वासू मित्र हिमलर याचाही ज्योतिषशास्त्रावर गाढ विश्वास होता. त्याने हिटलर जगज्जेता व्हावा, यासाठी २४ 'मंत्र–तंत्रज्ञ' ज्योतिष्यांवर चमत्कारिक सहाय्याचे काम सोपवले होते. त्यातील एका ज्योतिष्याने इटलीच्या नकाशावर 'सिद्धिलंबक' ठेवला असता; त्या लंबकाच्या डोलण्याने हिटलरच्या यशाची खात्री दिली होती. पण भविष्य उलटे फिरले! हिटलर दुसरे महायुद्ध हरला.

राजर्षी शाहू महाराजांकडे भविष्यकथन करण्यासाठी एक नामवंत ज्योतिषी आला. शाहूराजांनी त्याला दोन दिवसांच्या कडक उपासाचा आणि चाबकाच्या फटक्यांचा पाहुणचार दिला. तो टाळण्यासाठी ज्योतिषी गयावया करू लागला. शाहूराजांनी त्याला सुनावलं, ''दोन दिवसांनी तुझ्यावर कोणतं संकट कोसळणार आहे, ते तुला ज्योतिषशास्त्राने समजत नाही. तू काय माझं भविष्य सांगणार? लोकांना फसवण्याचे हे धंदे बंद कर!'' ज्योतिषशास्त्राचा खोटेपणा शाहूराजांनी कृतीतून सप्रयोग उघडा पाडला. '१९६४ मध्ये तिसरे महायुद्ध होणार', '२००० मध्ये जगबुडी होणार', त्याआधी 'हिमालय वितळणार', अशी भविष्यकथनं नामवंत ज्योतिष्यांनी केली होती. ती खोटी ठरली. तसेच, 'गांधीजींची हत्या होणार', 'कॉम्प्युटरवरून कुंडल्या निघणार', 'टीव्हीवरून ज्योतिष सांगितले जाणार', 'जगाला लॉकडाऊन करणारी कोरोना–महामारी येणार,' याबाबत सावधानतेचा इशारा देणारं भविष्य जगातल्या एकाही ज्योतिष्याने कथन केलेलं नव्हतं. ह्या शास्त्रात ''उडाला तर पक्षी आणि बुडाला तर बेडूक'' ठरवणारी चलाखी आहे!

लग्नासाठी जन्मपत्रिकेचे ३६ गुण जुळवण्याच्या बहकाव्यातून वर्ण्य–जाती व्यवस्थेची तुच्छता ज्योतिषशास्त्रातून पोसली जाते. उच्च जातीतल्या मुलीशी लग्न करणाऱ्या मुलाचा आणि कनिष्ठ जातीतील मुलाशी लग्न करणाऱ्या मुलीचा गुण–जुळणीत एक–एक गुण कमी होतो. अशा जातिभेद घट्ट करणाऱ्या शास्त्राचं भविष्य हे त्याच्या इतिहासासारखेच खोटेच ठरणारे असणार! हे असंख्य पुराव्यांनिशी स्पष्ट झाले आहे.

''आकाशातल्या आणि कुंडलीतल्या ग्रहांपेक्षा मनाचा निग्रह श्रेष्ठ असतो,'' अशी खात्री लोकांना देण्याची आज आत्यंतिक गरज असताना 'मोदी सरकार' मात्र राष्ट्रीय विद्यापीठातून 'मास्टर्स ज्योतिषी' तयार करीत आहे. त्याचं मार्केटिंग रुपाली चाकणकर यांच्यासारखे सत्ताधारी करीत आहेत, ही देशाच्या 'बौद्धिक महामारी'ची तयारी आहे. तिच्या समूळ उच्चाटनासाठी 'फुले–शाहू–आंबेडकर' यांचा विचार कृतीत आणणे, हीच जालीम लस आहे. ती घ्या आणि 'लॉस'मुक्त आयुष्य जगा ! बहिणाबाई चौधरी यांची ''ज्योतिषा''वरची कविता वाया घालवू नका!

*– समाजमाध्यमातून साभार*

# अमेरिका-इस्त्रायल-इराण शिमग्याचं कवित्व

**कोकणातील शिमगा (होळी) सणासारखीच 'सोंगं' नाचवत, आजवर अमेरिका जगावर आपलं अमानुष वर्चस्व गाजवत आलीय; सध्याचा अमेरिका-इस्त्रायलचा इराणवरील हल्ला, त्याच नितीशून्य 'लष्करी-दहशती'च्या परंपरेतला....**

१

**आपल्या डोळ्यासमोर कोसळणारं अमेरिकेचं 'आर्थिक-साम्राज्य' पाहून, आधी बावचळलेल्या आणि नंतर भयंकर खवळलेल्या, अमेरिकेचा 'बुडत्याचा पाय खोलात' अशी अवस्था आंतरराष्ट्रीय स्तरावर झालीय...त्यातूनच, जगावर 'शांतिदुता'चा मुखवटा धारण करत युद्ध पेटवणं, ट्रंप यांनी सुरु केलंय.**

एव्हाना, अमेरिकेला समजलं असेल की, इराण म्हणजे व्हेनेझुएला नव्हे आणि खोमेनेईचा इराण, म्हणजे 'सद्दाम हुसेन'चा इराक तर, नव्हेच नव्हे! सद्दाम हुसेनना जैविक व रासायनिक अस्त्रांचा साठा केल्याचा खोटा आरोप लावून मारल्यानंतर ISI चा जन्म झाला आणि त्यानंतर, स्थलांतरितांचा प्रश्न उग्र बनून संपूर्ण युरोपमधलं राजकारण कायमचं बदललं व अतिरेकी उजव्या राजकारणाचा उदय झाला...तसा तो भारतातही फोफावू लागला. त्यामुळे, या हल्ल्यानंतर अत्यानंदाने उड्या मारणाऱ्या 'अंधभक्तां'नी हे ध्यानात घ्यावं की, इराणमधल्या क्षेपणास्त्रांवर (Missiles) 'गोबर' किंवा 'गोमूत्र' लावलेलं नाही अथवा फ्रान्सच्या राफेल लढाऊ विमानांच्या शेपटांना भारताच्या संरक्षणमंत्र्यांनी बांधली; तशी, इराणी-क्षेपणास्त्रांच्या शेपटांना 'लिंबू-मिरची' बांधलेली नाही...आणि, अचानक 'ऑपरेशन-सिंदूर'समाप्तीसारखं ट्रंप यांच्या आज्ञेबरहुकूम शेळपटासारखं 'कच खाणारं' इराणी-सरकारही नव्हे! नमूद करण्याजोगी बाब म्हणजे, ज्या 'अँथ्रॉपिक' कंपनीच्या 'Claude AI'चा अमेरिकेने व्हेनेझुएलाच्या संदर्भात वापर केला; त्याचाच वापर इराणवरील हल्ल्यादरम्यान सढळपणे केला गेलाय... विशेष बाब म्हणजे, अँथ्रॉपिकने 'व्हाईट-हाऊस'समोर गुडघे टेकण्यास नकार दिल्याने सॅम ऑल्टमॅनच्या मजशिप अख' (ChatGPT वाली) बरोबर ट्रंप यांनी AI सेवा पुरविण्यासाठी करार केलाय. अमेरिकन लोकांच्या 'Mass Serveillence'साठी आणि स्वयंचलित शस्त्रास्त्रांसाठी 'Claude AI'चा वापर करु देण्यास अँथ्रॉपिकने ठाम नकार दिल्यानेच त्यांचा करार वॉशिंग्टनने संपुष्टात आणला...२०० मिलियन डॉलर्सच्या कराराला, आपल्या काही कार्पोरेटीय-मुल्यांसाठी धुडकावण्यासाठी, जेवढं अँथ्रॉपिकचं कौतुक करायला हवं; त्यापेक्षा कित्येक पट, सॅम ऑल्टमॅनच्या 'Open AI'चा तीव्र निषेध करायला हवा! इथे थोड्या विषयांतराचा दोष पत्करुन, हे आवर्जून सांगितलं पाहिजे की, ट्रंप-सरकारने खुन्नस काढण्यासाठी म्हणून अँथ्रॉपिकला चीन-रशियाच्या कंपनींसारखं शत्रू-कंपन्यांच्या यादीत टाकल्याची वार्ता पसरताच...अनेक अमेरिकन नागरिकांनी अँथ्रॉपिकच्या 'कॉर्पोरेट-कार्यालया'बाहेर फुटपाथवर 'थँक यू' असं मोठ्या अक्षरात रंगवून ऋणनिर्देश तर केलाच; पण, जवळपास १० लाखावर अमेरिकन नागरिकांनी सॅम ऑल्टमॅनच्या 'Open AI'चं 'ChatGPT' ॲप आपल्या मोबाईलवरुन काढून टाकलं व आजच्या घडीला 'अँथ्रॉपिक'चं 'Claude AI' ॲप 'प्ले-स्टोअर'वर एक नंबर गणलं जातंय...अशी जागरुकता भारतीयांमध्ये कधि येणार? आम्ही तर सरकारी पातळीवरुन आमचा सोन्याहून मूल्यवान असा 'डेटा', अमेरिका-इस्त्रायलला द्यायला निघालोत...मग, भारताच्या 'सार्वभौम अख' संरचनेचा प्रश्नच कुठे उभा रहातो...जिथे, आम्ही आमच्या देशाचं 'सार्वभौमत्व'च, अमेरिकन व्यापार-करारातून गहाण ठेवायला एका पायावर तयार झालोत!



२

**मनमोहनसिंगांना 'मौनीबाबा' म्हणून कालपरवापर्यंत हिणवणारा; आता, स्वतःच एक खराखुरा व डरपोक 'मौनीबाबा' म्हणून, भारतीय-जनतेला सामोरा येता झालाय!**

...असो 'ऑपरेशन-सिंदूर' वा असोत 'एपस्टिन-फाईल्स'...वॉशिंग्टनमधून आलेल्या एका फोनवर आमची 'हाफचड्डी' पिवळी होत असताना (जी भारतीय-स्वातंत्र्यलढ्याच्या काळात, कायमच तशी 'पिवळी' होती); गेली ४६ वर्षे (वर्ष-१९७९च्या इस्लामिक-क्रांति व अमेरिकी-दुतावासातील कर्मचाऱ्यांच्या ओलीस-नाट्यापश्चात) देशाचा श्वास घुसमटून टाकणाऱ्या अमेरिकी आर्थिक-निर्बंधांना निर्भयतेने व निर्धाराने तोंड देणाऱ्या इराणने; ज्याप्रकारे, अतिउन्मत्त झालेल्या अमेरिका-इस्त्रायलसारख्या राक्षसी-सत्तांचा, कमालीच्या शौर्याने मुकाबला करायला प्रारंभ केलाय...त्याचं कौतुक व्हायलाच हवं!

आपले सर्वोच्च नेते गद्दारीतून मारले गेल्यानंतर देखील ''दुश्मन का दोस्त, दुश्मन'' या वैश्विक-सुत्रानुसार, सौदी अरेबिया व इतर आखाती मुस्लिम देशांनाही अंगावर घ्यायला आजच्या अवघड स्थितीतही इराण कचरत नाही... त्या 'इराणी-हिंमती'ला कडकडीत 'धर्मराज्य-सलाम'! भांडवली-जगताच्या ऐशोआरामाला चटावलेल्या आणि चंगळवादी अमेरिकेच्या जीवावर स्वतःला सुरक्षित समजणाऱ्या तथा अमेरिकेचे 'गुलाम' बनलेल्या...दुबई-सौदी-अमिरातीमधल्या 'शेखां'ची 'शेखी' एव्हाना पुरती उतरली असेल... बुर्ज खलिफाची, प्राणीविश्वातल्या 'जिराफा'सारखी उंचच उंच मान, इराणच्या हल्ल्यापुढे साफ झुकलेली जगाने पाहिली, हे ही नसे थोडके!

पाकिस्तान-भारत, दोन्ही ठिकाणी झालेल्या मुस्लिम-समुदायाच्या निदर्शनांतून अमेरिका-इस्त्रायल व तेथील नृशंस नेतृत्त्वासोबतच 'सौदी अरेबिया'च्याही (तेथे मोहम्मद पैगंबरांचं जन्मस्थान 'मक्का' आणि कर्मभूमी 'मदीना' ही मुस्लिमांसाठी परमपवित्र असलेली स्थळे असूनही) विरोधात, तीव्र निषेधाच्या गगनभेदी घोषणा उठत होत्या...लक्षात घ्या, गुप्तचर-यंत्रणांनी वारंवार इशारा देऊनही खोमेनेईंनी लपूनछपून रहाणं साफ नाकारलं आणि हसत हसत देशासाठी 'हौतात्म्य' पत्करलं (नाहीतर, आमच्याकडचे नेते...शेकडो कमांडोंच्या सुरक्षा-गराड्यात राहूनही त्यांची, संसदेतल्या महिलांपुढे 'टर्किफाय' होते)! खोमेनेईंच्या क्रौर्यपूर्ण व दमनकारी कार्यशैलीबद्दल जरुर आक्षेप असावेत (भारतात, सध्या भाजप-संघीय राजवटीत, त्याचंच प्रतिबिंब बव्हंशी आढळतं, त्याचं काय करायचं?), ते आक्षेप आहेतच...पण, पाकिस्तानसारख्या सुन्नी देशातील देखील, लाखोंच्या संख्येनं जनता खोमेनेईंच्या कुटुंबासमवेतच्या हत्येपश्चात रस्त्यावर उतरते; याचा सरळ अर्थ, 'हुसेन इब्न अलि' यांच्या 'करबला' (इराक) येथील सातव्या शतकातील बलिदानानंतरचं, हे त्या दर्जाचं 'हौतात्म्य' ठरु पहातंय!

३

**एकीकडे, डोनाल्ड ट्रंप यांच्यावर टेरिफ-निकालाचा झालेला असह्य 'वार' व एपस्टिन-फाईल्सची टांगती 'तलवार'; तर दुसरीकडे, भ्रष्टाचारी नेतान्याहुंसाठी तुरुंग सजलेला व ऑक्टोबर-२०२६ च्या इस्त्रायलमधील निवडणुकांचा बिगुल वाजलेला....**

अमेरिका-इस्त्रायलच्या इराणवरील हल्ल्याने केवळ, अमेरिकन कॉंग्रेस व कायदेच धाब्यावर बसवले गेले, असं नव्हे; तर युनो, ICJ वगैरे आंतरराष्ट्रीय-व्यवस्थेला देखील सुरुंग लावला गेलाय....

ज्या गोष्टीसाठी इस्त्रायल गेली ३० वर्षे अमेरिकेच्या मागे भुणभुण लावून आहे; ती गोष्ट आत्ताच कशी घडून येते?

यासंदर्भातील, थोर आंतरराष्ट्रीय विचारवंत जेफ्री सॅक्स, यांच्या म्हणण्यानुसार इराणवरील हल्ला हा, ''इराणच्या अण्वस्त्रसज्जते विरोधातील नसून वा अमेरिकेच्या हितासाठी नसून; तो केवळ इस्रायल-सरकारच्या हितासाठी आहे...त्यामुळे, तो बायबलचे संदर्भ घेऊन असेल किंवा 'माईक हक्काबीं'सारख्या (ट्रंपने नेमलेले अमेरिकेचे इस्रायलमधील राजदूत) चर्च-सेवकांच्या दुराग्रहातून असेल अथवा 'एपस्टिन-फाईल्स'मधल्या उघड 'न' केल्या गेलेल्या धक्कादायक गुप्त बाबींमुळे असेल; पण, तो हल्ला अमेरिकेच्या हितासाठी नक्कीच नाही!''

युद्धाची औपचारिक घोषणा न करताच (वाटाघाटींचं गुऱ्हाळ चालू ठेवत व तथाकथित भारतीय 'विश्वगुरुं'ची इस्रायलमधून पाठवणी किंवा बोळवण करत) आणि णछ्छच्या सुरक्षापरिषदेची पूर्वपरवानगी न घेताच...आंतरराष्ट्रीय कायद्याचं सरळ सरळ उल्लंघन करत, हा हल्ला करण्यात आलाय. नुकत्याच पार पडलेल्या 'म्युनिक सिक्युरिटी कॉन्फरन्स'ची, 'म्युनिक सर्कस' बनवण्याचा घाट अमेरिका-इस्रायलच्या कुप्रभावाने घातल्याचं दिसतंय; कारण, त्यात आंतरराष्ट्रीय कायद्यासंदर्भात तावातावाने चर्चा झडून देखील, त्यात अमेरिका-इस्रायलच्या इराणवरील हल्ल्याचा साधा नामनिर्देशही करण्यात आला नाही.

विशेष नूमद करण्यासारखी बाब म्हणजे, वर्ष-१९८१च्या अंताला तत्कालीन अमेरिकन अध्यक्ष रोनाल्ड रीगन यांनी जारी केलेल्या E.O.12333 या आदेशानुसार परदेशी नेत्यांच्या हत्यांना कडक प्रतिबंध केलेला असतानाच... हे गुन्हेगारी, बेकायदेशीर कृत्य करण्याचं क्रौर्य व औधत्य, डोनाल्ड ट्रंप या महाभागाने दाखवलंय. या सर्व बाबींमुळे, अमेरिकेची विश्वासार्हता, कधि नव्हे एवढी रसातळाला गेलीय. अमेरिकेतील अंमली-पदार्थांच्या व्यापारासाठी (Drug-Trafficking) मेक्सिको जबाबदार असताना, दोन महिन्यांपूर्वी ट्रंप यांनी व्हेनिझुएलावर शरसंधान केलं आणि आता 'इस्लामिक-दहशतवादा'च्या नावाखाली (Islamic-Terrorism)...पाकिस्तान किंवा सिरीयाला जबाबदार धरण्याऐवजी, अडीच-तीन हजार वर्षांच्या प्राचीन पर्शियन-संस्कृतीचा वारसा असलेल्या 'संस्कृती-सघन' इराणला 'लक्ष्य' बनवण्याची घोडचूक केलीय; ती केवळ, मध्यपूर्वेत कायमस्वरुपी अनिर्बंध वर्चस्व मिळवण्याच्या इस्रायलच्या राक्षसी-हव्यासापोटीच! परिणामतः, सद्दाम हुसेन यांच्या इराकवर हल्ला करताना, जॉर्ज बुश यांना ८०% नागरिकांचं समर्थन होतं; पण, आज ट्रंप यांच्या इराणवरील हडेलहप्पी व गुन्हेगारी हल्ल्यानंतर, परिस्थिती बदलून बरोबर १८०°नी त्यांच्यावर उलटलीय! सर्वात कौतुक करायचं ते ब्रिटनचे मजूर पक्षाचे (Left of Centre) 'समाजवादी' पंतप्रधान 'केर स्टारमर' यांचं...त्यांच्या अत्यंत संयमी भूमिकेबद्दल ("Britain does not believe in regime-change from skies")! त्यांच्या सायप्रसमधील तळावर इराणकडून क्षेपणास्त्र हल्ला होऊनही त्यांनी...पहिल्या-दुसऱ्या महायुद्धात, जगातले देश युद्ध थांबवण्याचा प्रयत्न करण्याऐवजी, कोणाच्या बाजुने लढायचे; या विचारात जसे गुंतले होते...तशा प्रकारच्या चुका टाळून, आताच्या युद्धात अमेरिकेची साथ देण्यास स्पष्ट नकार दिलाय व त्यामुळे, तिसऱ्या महायुद्धाकडे जग, अनिवार्य वेगाने झेपावण्याची शक्यता खूप कमी झालीय.

४

**यावेळेस, 'शिकाऱ्या'चीच 'शिकार' होण्याची शक्यता अधिक....**

एकापेक्षा अधिक अत्याधुनिक F-15 अमेरिकी विमाने कुवेतमध्ये कोसळल्याच्या धक्कादायक बातम्यांनी आपली... 'ऑपरेशन-सिंदूर'समयीची फ्रान्स बनावटीची भारतीय राफेल लढाऊ विमाने, पाकिस्तानकरवी पाडली जाण्याची, भाजप-संघीय सरकारने दडवून ठेवलेली 'जखम' पुन्हा ताजी व्हावी! भले, इराणने ती F-15 विमाने पाडल्याचा दावा करो किंवा भले, ती कुवेतच्या नजरचुकीने 'फ्रेंडली-फायर'मध्ये पाडली गेल्याचा (प्रत्यक्षात, एवढी लष्करी 'कुवत', कुवेतमध्ये नाहीच), स्वतःचं लज्जारक्षण करु पहाणारा, अमेरिकी दावा असो...कुठेतरी, 'ऑपरेशन-सिंदूर'प्रमाणेच चीनच्या विमानविरोधी अत्याधुनिक-तंत्रज्ञानाचा वापर झाल्याचा संशय बळावल्याखेरीज रहात नाही. गेल्यावर्षीच्या अमेरिका-इस्रायलच्या, इराणवरील हल्ल्यानंतर चीनने, इतर वस्तुमालासमवेत शेकडो क्षेपणास्त्रांसाठी (मिसाईल्स) 'घन रॉकेट इंधना'साठी म्हणून लागणाऱ्या, 'सोडीयम-परक्लोरेट'चा किमान वर्षभर पुरेल एवढा...म्हणजे, जवळपास २ हजार टनाचा साठा, होर्मुझच्या सामुद्रधुनीतील 'बंदर अब्बास'मधून इराणला पाठवल्याची खात्रीलायक बातमी, यासंदर्भात महत्त्वाची आहे. त्यामुळेच, यावेळेस 'शिकाऱ्या'चीच 'शिकार' होण्याची शक्यता दिवसेंदिवस बळावत असून...इराणऐवजी अमेरिका वा इस्रायलमध्येच नव्हे; तर सौदी, बहारीन, कुवेत व कतारमध्ये सत्तांतर वा सत्ताबदल होण्याची मोठी शक्यता आहे.

...आखाती युद्धात, प्रथमच असं घडतंय की, इस्रायलने युद्ध पुकारलेल्या राष्ट्रापेक्षा दुपटीहून अधिक मनुष्यहानी इस्रायलची व्हावी; त्यामुळेच, इराणचे खोमेनेई लपूनछपून रहाण्यास, 'शिया' परंपरेनुसार नकार देत खुलेआम 'हौतात्म्य' पत्करत असताना...इस्रायलचा 'एपस्टिन-फाईल्स'मधला लिंगपिसाट, गुन्हेगार व नृशंस 'सत्ताधीश' तोंड लपवत, या बंकरमधून त्या बंकरमध्ये पळतोय!

डॉल्फ हिटलरला जशी 'ग्रेटर जर्मनिक राईश'ची आत्मघातकी स्वप्न पडत होती...तशाच, 'ग्रेटर-इस्रायल'च्या कुस्वप्न-पूर्तिसाठी (Promised Land), मध्यपूर्वेत आपलं बेलगाम वर्चस्व स्थापन करण्याचा इस्रायलला अधिकार...मात्र, बाकीच्यांना काहीच अधिकार नाही का? अमेरिकेच्या दृष्टीकोनातून, पर्शियन-संस्कृतीचा अडीच-तीन हजार वर्षांचा समृद्ध वारसा लाभलेला इराण 'दहशतवादी' आणि पाकिस्तान कुणी फार सोज्वळ लोकशाही राष्ट्र की, काय? इराण अण्वस्त्रसज्ज होण्याच्या नुसत्या व नसत्या कुशंकेने, इराणवर आक्रमण करण्याची जशी होते...तशी 'बुद्धी', अमेरिकेला पाकिस्तान अण्वस्त्रसज्ज झाल्यानंतर, कधि का झाली नाही... की, फरक इतकाच करायचा की, पाकिस्तानमध्ये मध्यपूर्वेसारखे तेलाचे साठे नाहीत आणि युरेनियमसारखी दुर्मिळ व मौल्यवान खनिजेदेखील नाहीत. शिवाय, पाकला अण्वस्त्रसज्ज होऊ देऊन, त्यातून भारतावर अंकुश ठेवण्याचा, अमेरिकेचा 'नापाक' इरादा थोडाच कधि लपून राहीलाय?

...सध्या इराणमधील परिस्थिती अशी आहे की, जोपर्यंत खोमेनेई नावाचा जुन्या पठडीतला सर्वोच्च नेता होता, तोपर्यंत इराणमध्ये ''आपला इस्लाम-धर्म अणुबॉम्ब, रासायनिक वा जैविक अस्त्रं...अशी 'सामूहिक संहाराची शस्त्रे' (Weapons Of Mass Destruction) बनवण्याची परवानगी देत नाही'', ही विचारधारा टिकून होती; मात्र, अमेरिका-इस्रायलने सत्तांतर घडवण्याच्या बेफजूल नादात, खोमेनेईंची जी बेकायदेशीर हत्या केलीय...त्यापश्चात, आज अज्ञात असलेलं, इराणमधलं जहाल नवतरुण-नेतृत्त्व, 'अणुबाँब' बनवण्याच्या दिशेने जाण्याची शक्यता खूपच बळावलीय!

...यातून एक अर्थ मात्र, स्पष्ट होत जातो की, इराणने आजवर इस्रायलसारखं अण्वस्त्रसज्ज 'न' होण्यात मोठीच चूक केलीय; अन्यथा, इराणवर उठसूठ आक्रमण करण्याची खुमखुमी, अमेरिका-इस्रायलला कधि झाली नसती...जशी ती, उ. कोरियाच्या बाबतीत कधि होत नाही!

५

**यहूदी कायदा 'हालाका', धर्मग्रंथ 'तालमुद' आणि हिब्रू बायबल 'तोराहा'चे विशेषज्ञ असलेले झिऑनिस्ट 'रब्बाई'च जर, सिनेगॉग या धर्मस्थळातून ज्यू-जनसमुदायाला, चुकीची दिक्षा व दिशा देत असतील तर....**

लक्षात घ्या की, अमेरिकेच्या चिथावणीने तसेच, मदतीने व ३८ राष्ट्रांचा पाठींबा असतानाही...आणि, इराणकडे तेव्हा लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे व आजच्यासारखी मारक क्षमता नसतानाही; सद्दाम हुसेनच्या इराकशी तब्बल ८ वर्षे इराणने एकट्याने 'मुकाबला' केला...तो शियापंथाचे तिसरे इमाम हुसेन यांच्या, 'करबला' हौतात्म्याच्या प्रेरणेतूनच! तोच 'मृत्युंजय' इराण, आज पुन्हा आपल्या अस्तित्वासाठी लढतोय, ती प्राचीन पर्शियन-संस्कृतीची जीवनमूल्ये सोबतीला घेऊनच! भारताचा पारंपारिक मित्र राहिलेल्या आधुनिक इराणने, गेल्या २०० वर्षांत कधि कोणावर आक्रमण केलेले नाही की, हकनाक कोणाशी कधि पंगा घेतलेला नाही. मात्र, आपला कुठलाही गुन्हा नसताना; इतरे राष्ट्रांच्या 'वसाहतवादी' वा 'अर्थवादी' आक्रमणामुळे (खनिज तेलाच्या अथवा दुर्मीळ खनिजांच्या लालसेपोटी) प्रश्न जेव्हा अस्तित्वाचा उभा राहिला; तेव्हा, इराकशी दीर्घकालीन युद्ध लढून, प्रसंगी १० लाखाहून अधिक इराणी नागरिकांनी, आपल्या 'शिया-बलिदान' परंपरेला जागून 'हौतात्म्य' पत्करत देशाला वाचवलेलं आहे!

...विशेष बाब म्हणजे, आपल्याकडे ज्याप्रमाणे भाजपाई-संघीय लोकं ''सतत रेटून खोटं बोलत असतात व कटकारस्थान रचत असतात''; तसाच सल्ला झिओनिस्ट धर्मगुरु 'रब्बाई' आपल्या अनुयायांना देत असतील (त्यातूनच, झिओनिस्ट-लॉबी आणि भाजप-संघीय लोक, यांच्यातील प्रगाढ मैत्रीचा, एक 'समानधर्मी पैलू' नजरेस यावा); तर, तेथील नेतन्याहूसारखे बदमाष, गुन्हेगार राजकारणी, कुठल्या पातळीवरचं खोटं बोलत असतील अथवा किती नीचतम पातळी गाठून 'षडयंत्र' रचत असतील?

याचसंदर्भात, हे आवर्जून नमूद केलं पाहिजे की, मध्यपूर्वेच्या आखातातील देशांच्या ९ अमेरिकन लष्करी अड्ड्यांवर इराणने जरुर हल्ले केले (अर्थातच ते तळ, एखाद्या राजदुतावासाच्या परिसराप्रमाणे अमेरिकेच्या स्वतःच्या मालकिचे असल्याने व तेथे फक्त, अमेरिकेचाच कायदा चालत असल्याने...ते हल्ले आंतरराष्ट्रीय-कायद्यानुसार अमेरिकेवरचेच हल्ले धरले जायला हवेत); सौदी अरॅमको तेलशुद्धीकरण प्रकल्पावरील व इतर निवासी ठिकाणांवरील हल्ले, आपण केले नसल्याचे इराणने निःसंदिग्ध शब्दात घोषित केल्याचं समजतं. याचाच अर्थ, आपल्याकडे जशा तथाकथित हिंदुत्ववाद्यांकडून व मुस्लिम धर्मांधांकडून, कटकारस्थानं रचून पद्धतशीररित्या हिंदू-मुस्लिम दंगली घडवल्या जातात; त्याचप्रकारे, आखाती मुस्लिम-राष्ट्रांमध्ये आपापसात युद्धे पेटवून, अमेरिका व

इस्रायलची 'झिओनिस्ट-लॉबी' 'बिनपैशा'चा तमाशा मजेत पहात बसणार होती. ''लोण्याच्या गोळ्याचे दोन सारखे भाग करण्यावरुन झालेल्या दोन बोक्यांच्या भांडणाचा गैरफायदा घेऊन, तो सगळाच गोळा मटकावणाऱ्या माकडाच्या'', बालपणीच्या गोष्टीतल्या बदमाषीसारखाच इस्रायल...ग्रेटर-इस्रायलच्या स्वप्नपूर्तिसाठी, हवा तेवढा आखाती-भूभाग बळकावून बसणार होतं व अमेरिका सगळ्याच आखाती देशांकडून युद्ध-नुकसानीची खंडणीद्वारे दामदुप्पट भरपाई करुन घेणार होती.

...धक्कादायक बाब ही की, इराणची भारतीय नौदलाच्या मिलान-२०२६ या बहुपक्षीय सरावातील १३० खलाशी असलेली 'देना फ्रिगेट', ही 'पाहुणी-युद्धनौका' इराणला परतत असताना...आंतरराष्ट्रीय समुद्री-हद्दीत कोणतीही पूर्वसूचना न देता, अमेरिकेने (जशी त्यांनी युद्ध सुरु करण्याची दिली नाही) तिच्यावर हल्ला चढवला...या विश्वासघातकी घटनेवर प्रतिक्रिया देताना, इराणचे परराष्ट्रमंत्री संतापून म्हणालेत, ''माझे शब्द लक्षात ठेवा : अमेरिकेला, त्यांनी घालून दिलेल्या या अवसानघातकी पायंड्याबद्दल, खूप पश्चात्ताप होईल!''

...पण, आपल्याच पाहुण्यांचं संरक्षण करण्यास साफ अपयशी ठरलेल्या व 'अदानी-एपस्टिन फाईल्स'मुळे अमेरिकेसमोर याअगोदरच, टॅरिफ-वॉर व व्यापार-करारानिमित्ताने नामर्द-नेभळट सिद्ध झालेल्या, शेळपट भाजप-संघीय भारत-सरकारबद्दल नेमकं काय बोलावं...???

६

**'While 'Brick-Work' of 'BRICS' was ongoing, American Trade-Deal and now, America-Israel attack on Iran, has hit it hard...What will happen to 'BRICS', now.. .??? ''**

भारताकडे यंदा 'ब्रिक्स'ची 'चेअरमनशिप' असूनही द. आफ्रिकेत नुकत्याच पार पडलेल्या नौदलाच्या ''Will for Peace-2026'' या सामूहिक सरावाला गेला नाही... एवढंच नव्हे तर, यंदाच्या 'WEF'च्या बैठकीलाही मोदी गेले नाहीत; कारण, तिथे अमेरिकेचे डोनाल्ड ट्रंप जाणार होते. मनात भिती ही होती की, ट्रंप त्यांच्या सवयीनुसार गळ्यात हात टाकून (लक्षात घ्या की, सौदी राजपुत्राला कोणीही स्पर्श करायचा नसतो, असा कडक नियम असूनही, ट्रंप यांनी एका आंतरराष्ट्रीय बैठकीत त्यांचा खांदा पकडून अनावस्था प्रसंग निर्माण केला होता...हे मोदींच्या चांगलंच स्मरणात असेल)... ''आपण कसं भारत-पाकिस्तानमधलं संभाव्य आण्विक युद्ध थांबवलं'', असं बेधडक जाहीरपणे वक्तव्य करुन मोदींची मोठीच गोची केली असती.

'डग्लस मेकग्रॅगोर' या अमेरिकन युद्धतज्ज्ञाच्या म्हणण्यानुसार, 'America has tactics in place, as in killing Iranian top leadership... which wins battles, no doubt, but it completely lacks 'strategy' that wins wars!'' याचाच अर्थ, अमेरिका बॉम्बफेक करुन इराणी-नेतृत्त्वाला संपवू शकते; पण, बॉम्बवर्षावातून हजारो वर्ष जुन्या व समृद्ध इराणी-संस्कृतीला (Persian Culture) संपवू शकत नाही; हे डोनाल्ड ट्रंप व त्यांचे सल्लागार विसरले.

डिकॉय-मिसाईल्स आणि मल्टीपल-वॉरहेड्सच्या बळावर, इस्रायलच्या तथाकथित अभेद्य 'आयर्न डोम'ची चाळणी करण्यात इराण यशस्वी झालाय. दुसरीकडे, क्षेपणास्त्रविरोधी (अँटी-मिसाईल्स) यंत्रणांची वानवा निर्माण होण्याची शक्यता दिसू लागलीय (इराणी जमिनीवर जागोजागी रेखाटलेल्या विमानांच्या भव्य चित्रकृतींवरच, अनेक अमेरिका-इस्रायली बॉम्बहल्लेही वाया गेल्याची बातमी आहे)...हे अमेरिका-इस्रायलसाठी फार मोठं दुश्चिन्हच होय. युक्रेनसोबतच्या युद्धात रशियाच्या युद्धसामग्रीची व मनुष्यबळाची मोठी हानी घडवून आणून रशियाला कमजोर करायला निघालेल्या अमेरिकेपुढे; तेच संकट, इस्रायलमुळे 'दत्त' म्हणत उभं ठाकलंय... अमेरिकेची 'युद्धनिती' अमेरिकेवरच 'बूमरॅंग' झालीय! इस्रायलच्या नादाने, अमेरिकेतील अब्जो-खर्वोपती 'ज्यू-लॉबी'च्या दबावामुळे अथवा एपस्टिन-फाईल्सच्या 'ब्लॅकमेलिंग'मुळे ट्रंप यांनी, हा इराणवर हल्ला करण्याचा आत्मघातकी निर्णय घेतला व सगळ्या जगालाच अस्थिर करुन टाकलंय. कुठलंही राष्ट्र, इतर कुठल्या राष्ट्रावर विश्वास ठेऊ शकणार नाही...एवढी आंतरराष्ट्रीय भू-राजनैतिक परिस्थिती विकोपाला गेलीय.

...म्हणूनच, आंतरराष्ट्रीय वाटाघाटींवर विश्वास ठेवण्याचा जमाना, बहुतांश इतिहासजमा झालेला असताना; आमचे तथाकथित 'विश्वगुरु', करोडो-अब्जावधी रुपयांचा चुराडा करत जगभर का फिरतायत, याचं खरंतरं उत्तर मागितलं गेलंच पाहिजे.

...बाय द वे, भारताला इराणचा पारंपारिक मित्र म्हणून, तुर्कस्तानपेक्षा सदर संग्रामात 'युद्धविराम' घडवून आणण्याची अधिक मोठी संधि होती; पण, आपल्या तथाकथित 'विश्वगुरुं'नी इस्रायलचरणी लोटांगण घातल्याने (बहुधा, पेगासस-Pegasus व एपस्टिन-फाईल्सच्या दबावापोटी)... भारताला ही मोलाची संधि लाभण्याची शक्यता धूसर झालीय.

७

**''विसाव्या शतकाच्या मध्यातील वसाहतवादी-दमनशक्ति'च्या अमेरिकी-ब्रिटीश दुष्प्रयोगाचेच, पुढे जाऊन दशकानुदशके उमटलेले पडसादच आज आपण पहात आहोत''....**

''विन्स्टन चर्चिल यांचं इराणी-राजकारण मला पूर्णतया ज्ञात आहे''...ट्रंप यांच्या वरील जाहीर वक्तव्यावर 'जॉर्ज मॉनबायॉट', हा ख्यातनाम राजनीतिज्ञ म्हणतो, ''ही गोष्ट चांगली यासाठी आहे; कारण, त्यामुळे ट्रंप यांना कळावं की, आजची इराणची समस्या, ही विन्स्टन चर्चिल यांनी वर्ष-१९५३मध्ये इराणमध्ये अमेरिकेच्या 'CIA'सोबत केलेल्या 'ऑपरेशन-जॅक्स'मुळे झालेली आहे...ज्यात, इराणच्या संपूर्ण तेल-उद्योगाचं (ब्रिटीश 'अँग्लो-इरानियन' कंपनीसह) देशहितासाठी 'राष्ट्रीयीकरण' करणाऱ्या तत्कालीन इराणी पंतप्रधान मोहम्मद मोसादेघ (Mohammad Mosaddegh) यांच्या अत्यंत लोकप्रिय राजवटीचा, जबरदस्तीने कटकारस्थान रचून 'सत्तापालट' घडवून आणला होता आणि शाह रझा पेहेलवी यांच्या अत्यंत क्रूर, खुनशी हुकूमशाही-राजवटीची अमेरिका व ब्रिटनकरवी प्रस्थापना केली गेली होती. जुलमी शाह-राजवटीला 'जशास तसे' प्रत्युत्तर (Imperial Blowback) म्हणूनच, वर्ष-१९७९ला इराणमध्ये अयातुल्ला खोमेनी यांच्या नेतृत्त्वाखाली, तशीच रक्तरंजित दडपशाही करणारी 'इस्लामिक-क्रांति' झाली!''

...याचसंदर्भात, बीजिंगमधील प्रोफेसर जियांग यांनी केलेल्या तीन मोठ्या राजनैतिक भाकितांपैकी पहिली दोन भाकीते आजवर खरी ठरलेली आहेत...त्यातलं पहिलं म्हणजे ''ट्रंप, हे अमेरिकन अध्यक्षीय निवडणूक जिंकतील''. दुसरं म्हणजे, ''ते इराणशी युद्ध पुकारतील'' आणि तिसरं, ''अमेरिका, ते युद्ध हारेल!''

त्यांच्या म्हणण्यानुसार ''इराण, गेली २० वर्षे त्या संभाव्य संघर्षाच्या व त्याद्वारे, अमेरिकन आर्थिक-साम्राज्याला हादरे देण्याच्या तयारीला लागलं होतं. त्याचाच भाग म्हणून जागतिक-अर्थव्यवस्था खिळखिळी करण्याच्या रणनितीचा भाग म्हणून, त्यांनी 'GCC'मध्ये (Gulf Co-operation Council for the Arab States of the Gulf) मोडणाऱ्या देशांवर हल्ला चढवला व 'होर्मुझची सामुद्रधुनी' बंद करुन जागतिक-ऊर्जासंकट निर्माण केलंय...यानंतर पुढच्या टप्प्यात इराण, युद्धस्थिती अगदीच विकोपाला गेल्यास, आखाती अरब राष्ट्रांच्या 'समुद्राचं खारं पाणी पिण्यायोग्य बनवण्या'च्या 'निक्षारीकरण-प्रकल्पां'वर (Desalination Plants) हल्ले चढवून, त्यांच्या तोंडचं पाणी पळवेल. तसेच, तेलविक्री धोक्यात आल्याने आखाती अरब राष्ट्रांची अमेरिकन 'AI' उद्योगात असलेली सर्वात मोठी गुंतवणूक कोलमडेल व आखाती पेट्रो-डॉलर्स पुन्हा अमेरिकन अर्थव्यवस्थेत येणं रोडावल्याने, २००८च्या डॉट.कॉम फुगवट्यापेक्षा मोठा असलेला 'AI'चा फुगा फुटेल. परिणामतः, गुंतवणूकदारांची अंति फसवणूक करणाऱ्या एखाद्या 'Ponzy Scheme' सारखी असलेली अमेरिकन-अर्थव्यवस्था कोसळून पडण्याच्या स्थितीत येऊ शकते. शिवाय, अमेरिकन लष्करी-सज्जता, ही दुसऱ्या महायुद्धापश्चातच्या 'शीतयुद्धा'साठी (Cold War) अनुरुप अशीच आजही आहे...२१व्या शतकातील युद्ध खेळण्यासाठीची ती अमेरिकन-सिद्धता नव्हेच! त्यातूनच, चंद्र-मंगळावर जाण्यासारख्या अत्युच्च-तंत्रज्ञानाधारित व अतिप्रचंड खर्चिक असलेल्या योजना आखण्याचीच लष्करी-मानसिकता अमेरिकेत आजही दिसते...त्यामुळेच, या युद्धात ५० हजार डॉलर्सच्या इराणी-ड्रोनचा, १० लाख डॉलर्सचं अमेरिकन क्षेपणास्त्र मुकाबला करताना आपल्याला दिसतं व त्याचीच परिणती गेली २० वर्षे प्रकर्षाने दिसणाऱ्या जागतिक अमेरिकन-वर्चस्वाच्या फुग्याला, 'इराणी-टाचणी' टोचली जाऊन तो फुटेल!''

८

**"Iran, not Gaza or Any Gulf-Arab contry...No 'Boots' on the ground only 'Bombs' in the air; war-criminal 'Bibi' can't win this war...!!!"**

आजची परिस्थिती, ही दुसऱ्या महायुद्धावेळची परिस्थिती नव्हे; जेव्हा, निव्वळ 'हवाई-वर्चस्वा'ने (Air Supremacy) युद्ध जिंकता येत होतं. कोरियन आणि व्हिएतनामी युद्धात हे प्रयोग असफल ठरलेले आहेत... इराकमधील अमेरिकेचं युद्ध आणि आताचं इराणविरुद्धचं युद्ध, यात जमीन-अस्मानाचा फरक आहे.

इराणची क्षेपणास्त्रे व ड्रोन्स, कमालीची अचूक मारा करत असताना...अमेरिकेची बॉम्बफेक वा क्षेपणास्त्र-मारा लक्ष्यापासून दूर भरकटताना जग पहातंय (द. इराणमधल्या लहान मुलींच्या शाळेवरचा टॉमहॉक क्षेपणास्त्राचा हल्ला, दुसरं काय दर्शवतो?)

हजारो वर्षांची इराणी पर्शियन-संस्कृती व त्यांची परंपरागत चिकाटी; ही 'पाणवनस्पती'सारखीच...वरुन पानं सुटी सुटी दिसतात (त्या भ्रमामुळेच, अमेरिकेच्या विकृत, बलात्कारी

अध्यक्षाला खोमेनेईंच्या मृत्यूपश्चात 'सत्तापालटा'ची स्वप्नं पडत होती); पण, पाण्याखालची मूळं, अगदी अतूट बंधनात बांधल्यासारखी एकमेकांशी बद्ध असतात...त्यांना विलग करणं, कर्मकठीण असतं; तशीच, ही इराणी जनता व इराणी-व्यवस्था, या अशा आपत्कालीन परिस्थितीत 'फेव्हीकॉल का जोड, टूटता नहीं'', अशी एकसंध व अपराजेय निर्धाराने, 'शिया-परंपरे'ला स्मरुन-अनुसरुन बलिदानासाठी सिद्ध झालीय! अमेरिका काय किंवा इस्रायल काय; दोन्ही देशांचे प्रमुख...युद्ध-गुन्हेगारी, बलात्कार, अल्पवयीन मुलींचं लैंगिक-शोषण, भ्रष्टाचार वगैरे अत्यंत गंभीर गुन्ह्यात अडकलेले! मानवतेला कलंक असणारे हे दोन्ही राष्ट्रप्रमुख, आपल्या राक्षसी-सामर्थ्याचा व अमानुष गुन्हेगारी-षडयंत्री राजकारणाचा परिचय देताना...अविचाराने इराणचे ८६ वर्षांचे सत्ताधीश खोमेनेईंची, केवळ हत्याच करुन बसले, असं नव्हे; तर त्यांच्यासोबतच, जे कोणी युद्ध टाळण्यासंदर्भात विवेक बाळगून चर्चा करु शकण्याच्या मनस्थितीत होते, त्यांनाच ते संपवून बसलेत. तशा चर्चा ओमानच्या मध्यस्थीने जिनिव्हामध्ये सुरु असतानाच इराणला बेसावध ठेऊन अमेरिका-इस्रायलने दगाफटका केला व त्यात अली शमखानी (Secretary of Iran's Defence Council), मोहम्मद पाकपोर (IRGC Commander), अझीझ नासीरझादेह (संरक्षण मंत्री), अब्दुलरहीम मौसावी (सैन्यदलप्रमुख) 'शहीद' झाले...आणि, आता दुसऱ्या-तिसऱ्या फळीतील जे 'IRGC'चं, अहमद वाहिदींसारखं आक्रमक नेतृत्त्व पुढे आलंय; त्याला आपल्याला हव्या तशाच व हव्या त्याच शर्ती, अमेरिका-इस्रायलने मानण्यापलिकडे कुठल्याही चर्चासत्रात बिलकूल रस नाही...त्यांना सगळ्याचाच फैसला रणांगणावर करायचाय. विशेष बाब ही की, खोमेनेईंनी केवळ, इराणच्या अण्वस्त्रसज्जतेलाच नव्हे; तर, संभाव्य युद्धाचा आयाम, नियंत्रणाबाहेर जाऊन तिसऱ्या जागतिक महायुद्धासारखी स्थिती उद्भवू नये; म्हणून, ५००० कि. मी. पल्याड पल्ला असलेल्या 'क्षेपणास्त्र-विकासा'लाही ठाम प्रतिबंध केला होता. मात्र, कुठल्याही आपत्कालीन स्थितीत, IRGC (Islamic Revolutionary Guard Corps), बसीज मिलिशिया (Basij or the Basij Mostazafan), इस्लामी धार्मिक-नेटवर्क आणि अंतर्गत सुरक्षा-यंत्रणा (IRGC, intelligence services, and an "axis of resistance" proxy network मिळून बनलेली) संपूर्ण संरक्षण-यंत्रणा त्यांनी दीर्घकालीन परिश्रमाना घडवलेली असून; ती कुठल्याही परिस्थितीला ''जिंकू किंवा मरु'', अशा 'शिया शहीदी-बाण्या'ने सामोरी जाऊ शकते.

...म्हणूनच, ''इराण शरणागती पत्करेल ही भावना, ट्रंप यांच्या कबरीतच दफन होईल'', ही इराणची दर्पोक्ती नसून, डरपोक अमेरिका-इस्रायलला तो सक्त इशारा आहे!

९

**संवेदनासहित मानवी 'नीतिमत्ता' विरुद्ध संवेदनारहित कृत्रिम 'बुद्धिमत्ता' (AI)....**

१६५ शाळकरी मुलींचे क्रौर्यपूर्ण बळी घेणाऱ्या, इराणमधल्या लहानग्यांच्या शाळेवरील अमेरिकन 'टॉमहॉक' क्षेपणास्त्र-हल्ल्यासंदर्भातील एका ताज्या धक्कादायक अहवालानुसार...कृत्रिम बुद्धीमत्तेचा (AI) वापर करणाऱ्या अँथ्रॉपिक कंपनीच्या 'Claude AI' प्रणालीनुसारच तो 'दुहेरी' हल्ला करण्यात आला होता. 'डबल-टॅप' लष्करी-तंत्रानुसार, शाळेपासून काही मीटर अंतरावरील एका आरोग्य केंद्रावर प्रथम हल्ला करण्यात आला व नंतर, जास्तीतजास्त जिवितहानी व्हावी; या सैतानी वृत्तीने व हेतूने, १५-२० मिनिटांनी शाळेवर दुसरा हल्ला करण्यात आला. कारण, पहिल्या हल्ल्यानंतर स्वाभाविकच पळापळ करत जवळच्याच शाळेत आसरा घेणारी आजुबाजुची लोकं, डॉक्टर्स, नर्सेस, मुलींचे पालक वगैरे मंडळींचा किड्यामुंग्यांसारखा मोठ्या संख्येत खातमा करता येणं, सहजसाध्य होणार होतं.

...याव्यतिरिक्त, 'जेफ्री सॅक्स' या थोर विचारवंताचं म्हणणं आहे की, ''ज्यापद्धतीने अमेरिका आणि इस्रायलकडून तेहरानवर बॉम्बवर्षाव करुन रक्ताचे पाट वाहावले जातायत... ती बॉम्बफेक, ही विशिष्ट लक्ष्याप्रति ('Targeted') नसून; ती सरसकट तेहरान भस्मसात करु पहाणारी, औरसचौरस स्वैर बॉम्बफेक (Carpet Bombing) आहे आणि ती कुठल्याही सुसंस्कारित मनाला प्रचंड यातना देणारी आहे...निःशस्त्र-निष्पाप नागरिकांचं ते सामूहिक-हत्याकांड असून अखिल मानवतेचीच ती क्रूर हत्या आहे... आणि दुर्दैवाने, ''हे सगळं **'Book of Revelation'** या ख्रिस्ती धर्मग्रंथातल्या 'अर्मागेडन' (Doomsday, Apocalypse, Judgment Day, Final War, Cataclysm like End Times) संकल्पनेनुसार सुरु झालेलं, सुष्ट आणि दुष्टांमधलं अंतिम युद्ध असून...त्यातून, जेवढा जास्तीतजास्त मनुष्यसंहार होईल; तेवढा दुष्टांचा नायनाट होऊन येशू ख्रिस्ताचा दुसरा अवतार पृथ्वीवर अवतीर्ण होणं सुलभ होईल''...असा जो, भाकड व आत्यंतिक घातकी 'अंधविश्वास' डोनाल्ड ट्रंप यांचे पाठिराखे व प्रचारक, अमेरिकी ख्रिस्ती लोकांमध्ये पसरवतायत; तो अतिशय धक्कादायक व धोकादायक आहे!'' आपल्याकडे 'हिंदुराष्ट्रा'ची विखारी-विद्वेषी संकल्पना भोळ्याभाबड्या जनतेमध्ये रुजवताना, ही अशीच चलाखी व बदमाषी भाजप-संघीय लोकं आजवर करत आलीयत!

एकूणच, 'भांडवलशाहीची मक्का' असलेल्या अमेरिकन देशातील गौरवर्णी-वर्चस्ववादी नृशंस मानसिकता म्हणजे, 'साम्राज्यवादी-वसाहतवादी युरोपीय' मानसिकतेनंतरचा (European Imperialism Colonialism)...मानवी-जगताला लागलेला 'महारोग' आहे. 'डोनाल्ड ट्रंप' (आणि अमेरिकेच्या खास मित्र राष्ट्राचा प्रमुख म्हणून 'नेतन्याहू') प्रतिनिधित्व करत असलेल्या ''भयंकर लालसा, रक्तपिपासूवृत्ती, निर्दयतेचा कहर आणि अमानुष शोषक मनोवृत्तीचा''...मानवी जगताला लागलेला, तो 'कर्करोग' (कॅन्सर) आहे आणि त्याचा समूळ नायनाट झाल्याखेरीज अथवा पाशवी-पातकी 'अमेरिकी-मनोवृत्ती'त आमूलाग्र व क्रांतिकारी बदल झाल्याखेरीज आणि बहुसंख्य अमेरिकनांनी गौतम बुद्धाचा आणि म. गांधींचा ''मानवता, प्रज्ञा ('आसक्तिमय बुद्धी' नव्हे), करुणेचा सन्मार्ग पूर्णतया अनुसरल्याखेरीज''...जगात कदापि शांतता नांदणे नाही आणि अखिल मानवतेला सुखसमाधानात जगता येणेही नाही!

....बाय द वे, ''एका जगविख्यात पंतप्रधानाने, निर्दय मारहाण करत पशूसारखा माझ्यावर बलात्कार केला होता... मला गुलामासारखी वागणूक देऊन, जगातल्या बड्या व शक्तिशाली व्यक्ति, माझा असहाय्य स्थितीत क्रौर्यपूर्ण उपभोग घ्यायचे'' असं, आत्महत्या करण्यापूर्वी...'व्हर्जिनिया गुफ्रे' (from Virginia Giuffre's memoir "Nobody's Girl"), या एपस्टिन-फाईल्समधल्या प्रमुख पिडीतेने, जे धक्कादायक व माणुसकीला काळीमा फासणारं विधान केलंय, ते नेमकं कोणाबद्दल...???

१०

**'It is easy to lure the Russian bear from it's high; but is very difficult to put it back!'', Otto Von Bismark....**

इराकप्रमाणेच वर्ष-२००७ पर्यंत, इराणमध्ये एकमेव केंद्रानुवर्ती आदेश-संस्कृती (Centralised Command) संरक्षणदलांमध्ये मौजूद होती...पण, सद्दाम हुसेन यांना खोटे आरोप लावून अमेरिकेकरवी ठार मारण्यात आल्यापश्चात, जी इराकची ससेहोलपट झाली; त्यावरुन धडा घेत, इराणने वर्ष-२००७ मध्ये 'IRGC'प्रमुख 'मोहम्मद अली जाफरी-तत्त्वप्रणाली'नुसार (Doctrine) ३१ 'स्वायत्त' लष्करी-विभाग बनवण्यात आले. आणीबाणीच्या प्रसंगी (उदा. प्रमुख नेत्याच्या हत्येपश्चात) नवीन प्रमुख नेता नेमला जाईपर्यंत; स्वतःच्या आकलनानुसार स्वतंत्रपणे लष्करी-निर्णय घेण्याचे व ते जसेच्या तसे अंमलात आणण्याचे 'पूर्णाधिकार' त्यांना देण्यात आले; त्याचीच, केवळ कटू नव्हे; तर, अगदी विषारी-जहरी फळं, अमेरिका-इस्रायल या दोन 'महापातकी' राष्ट्रांना भोगावी लागतायत...त्यातूनच, दीर्घकालीन व अधिक व्यापक युद्धस्तराचा फायदा (Escalation Supremacy) इराण अचूक मिळवतोय!

१० मार्चच्या (वर्ष-२०२६) मंगळवारी युनोच्या सुरक्षापरिषदेत १४ देशांनी जर्मनी, जपान, फ्रान्स, द. कोरिया या अमेरिकेच्या मित्र देशांनी, अमेरिकेचे युनोमधील राजदूत भाषण करत असतानाच सरळ सभात्याग केला; याचाच अर्थ, डोनाल्ड ट्रंप यांनी मध्यपूर्वेतील राजकीय घडामोडींवरील आपलं नियंत्रण गमावलंय! ''इराण, आमच्याकडे समझोत्याची भीक मागत येईल'', यावर प्रत्युत्तरादाखल इराणचे परराष्ट्रमंत्री 'We reject everything!'' एवढेच तीन शब्द बोलले; त्यातच सगळं आलं. फ्रान्स, ब्रिटनचा प्रत्यक्ष लष्करी-कारवाईस विरोध व सौदी राजपुत्राच्या इराण-सरकारशी गुप्त वाटाघाटी, हे त्याचचं निदर्शक...''हा अमेरिकेसोबत केलेला विश्वासघात आहे'', या ट्रंप यांच्या वाक्ताडनावर, या सर्वच देशांकडून देण्यात आलेलं चोख प्रत्युत्तर म्हणजे, ''इराणशी युद्ध सुरु करताना, आमच्याशी तुम्ही चर्चा केली नव्हती; आता, आम्हाला युद्धसमाप्तीबाबत प्रयत्न करु द्या!'' तोवर, खनिज तेलाच्या भडकलेल्या किंमतीच्या अग्नितांडवात सापडून अमेरिका-इस्रायलचे काळे मनसुबे जळून खाक होतील, हे निश्चितच! पण, अमेरिकेचा घटता जागतिक-प्रभाव, देशांतर्गत युद्धाला वाढता विरोध आणि 'Doplomatic Isolation Premium'' म्हणून संबोधली गेलेली शेअरबाजाराची घसरण''...यातून एकतर, अमेरिका 'Escalation Supremacy'साठी आत्मघातकी-धोकादायक पाऊल उचलेल किंवा जागतिक सत्ता-समतोलात कायमस्वरुपी मोठा बदल घडून येईल.

...दुर्दैवाने, पहिला पर्याय ट्रंप या विक्षिप्त, अहंमन्य व गुन्हेगार अमेरिकन राष्ट्राध्यक्षाने निवडायचं ठरवलंच; तर, प्रशियन राजनितीज्ञ (१८५१-१८५९) 'ऑटो व्हॉन बिस्मार्क'चे (Otto Von Bismark) ऐतिहासिक उद्गार, ट्रंप यांनी विसरणं... त्यांच्याच अमेरिकेसह संपूर्ण जगाला फार महागात पडू शकतं!

***...राजन राजे,*** अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष (क्रमशः)



ठाणे स्टेशन येथील रिक्षा-टॅक्सी चालकांच्या तसेच वाहतूक कोंडी व इतर समस्यांच्या अनुषंगाने, मंगळवार, दि. २१/०४/२०२६ रोजी ठाणे शहर वाहतूक विभागाच्या सिनिअर पोलीस इन्स्पेक्टर मा. रोहिणी सोनार मॅडम व पोलीस सब-इन्स्पेक्टर मा. श्री. विजय कांबळे साहेब यांच्याबरोबर चर्चा करण्यात आली. त्यावेळी त्यांच्याकडून समस्यांवर लवकरात लवकर तोडगा काढण्याचे आश्वासन देण्यात आले. यावेळी, धर्मराज्य पक्षाचे सचिव श्री. नरेंद्र पंडित, धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचे सचिव श्री. समीर चव्हाण, स्थानिक रिक्षा-टॅक्सी चालक-मालक युनियनचे श्री. सुशिलकुमार चंद्रा, श्री. रवि मिश्रा व इतर सहकारी उपस्थित होते.




शनिवार, दि. १८/०४/२०२६ रोजी एमजीएम हॉस्पिटल (नौपाडा) रिक्षा स्टॅन्ड, कळंबोली येथील रिक्षा चालकांच्या समस्या सोडविण्यासाठी कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अजय भोसले यांची भेट घेण्यात आली. यावेळी रिक्षा चालकांच्या समस्यांवर सविस्तर चर्चा करून परस्पर समन्वयाने सन्मानजनक तोडगा काढण्यात आला. या प्रसंगी धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचे सचिव श्री. समीर चव्हाण, धर्मराज्य पक्षाचे सचिव श्री. नरेंद्र पंडित, नौपाडा रिक्षा स्टॅन्ड प्रमुख श्री. बाबुराव भगत व इतर सहकारी उपस्थित होते.

# लाल झेंड्यांच्या सावलीत

सगळं बदललं आहे
जग बदललं आहे
पण कारखान्यांच्या भिंतींवर
आताही साचलेली आहे तीच काळी करप
फक्त मशिनं वेगवान झाली आहेत
आणि कामगारः थोडा अजून स्वस्त

मानेसरच्या फॅक्ट्रीच्या गेटवर
आताही उभे आहेत काही चेहरे
ज्यांच्या डोळ्यांत बंद आहे
अधुऱ्या संपांचा धूर
नोएडाच्या कारखान्यांत
जिथे कधी घुमायचा मशिनांचा आवाज
आज ठेका, कामावरून कमी करणे आणि खटले
इथली रोजची भाषा झाली आहे
आणि न्याय
एक पुढे ढकललेली तारीख

कुठे आशियातील घामाने ओले कारखाने
कुठे आफ्रिकेच्या खाणींमध्ये गाडली जाणारी शरीरं
कुठे युरोपच्या थंड गोदामांत गोठणाऱ्या बोटांनी
भविष्याची स्वप्नं पॅक होत आहेत
अमेरिकेच्या झगमगत्या रस्त्यांच्या खाली
डिलिव्हरी बॉयचे मोडणारे गुडघे
आणि लॅटिन अमेरिकेच्या शेतांमध्ये
आताही वाकणारे कणे
मूठभरांच्या तिजोरीमध्ये लूट साचवत आहेत
पण कथा इथेच संपत नाही

अरावलीच्या तुटलेल्या डोंगररांगांमध्ये
धुळीत माखलेले काही लोक
आताही उभे आहेत
आपल्या जल-जंगल-जमिनीसमवेत
त्यांना कामगार म्हटलं जात नाही
पण त्यांचा प्रत्येक श्वास
मेहनतीची साक्ष देतो
सुरजागडच्या शांततेत
नियमगिरीच्या डोंगरांवर
ईशान्येच्या फिजांमध्ये
जिथे जंगल फक्त जंगल नाही
तर जीवन आहे
तिथे आदिवासी उभे आहेत छाती ताणून
खनन कंपन्यांसमोर
त्यांच्या हातात कुठली मोठी मशिन नाही
फक्त परंपरा, स्मृती आणि जमिनीशी नातं आहे
त्यांनाही म्हटलं जातं -विकासविरोधी!
त्यांनाही घाबरवलं जातं
कधी कायद्याने
कधी बंदुकीने
पण त्यांचा संघर्षही तितकाच श्रम आहे
जितका एखाद्या कारखान्याचा घाम

म्हटलं गेलं
आता सगळे 'गिग वर्कर' झाले आहेत
स्वतंत्र आहेत
स्वतःचे मालक आहेत
पण खरं हे होतं
की मालक आता दिसत नव्हते

ते ॲपमध्ये लपले होते अल्गोरिदममध्ये
आणि कामगारः
फक्त एका 'आयडी'मध्ये सिमटला होता
आठ तासांचं स्वप्न
बारा-चौदा तासांत तुटून पडलं होतं
ओव्हरटाइम आता मजबुरी होती
आणि सुट्टी एक चैनीची गोष्ट
संघटना बांधणं
आताही संशयाने पाहिलं जात होतं
संप म्हणजे एखादा घृणास्पद गुन्हा
जे सूरात सूर मिसळून आवाज उठवत होते
'हर जोर जुलूम की टक्कर में
हड़ताल हमारा नारा हैं'
त्यांना ठरवलं जात होतं-विकासविरोधी!
देशद्रोही!
अर्बन नक्षल!
किंवा फक्तः गप्प केलं जात होतं

तरीही
एखाद्या बंदरावर
एखाद्या खाण-कारखान्याच्या गेटवर
एखाद्या शेताच्या बांधावर
एखाद्या जंगल-डोंगरावर
हळूहळू उठत होते आवाज
भाषा वेगळ्या होत्या
पण स्वप्न एकच होतं
'सगळ्यांमध्ये सुखाचा समान वाटा असो!'
आणि नारा एकच होता
'जगातील कामगारांनो, एक व्हा!'
एक म्हातारा कामगार



लोखंडी हातांच्या भेगांमध्ये
आताही लपवून ठेवत होता
एक 'मे' चा इतिहास
आणि एक आदिवासी स्त्री
आपल्या जंगलाच्या मध्ये
धरतीला स्पर्श करून म्हणत होती
'हीच माझी मजुरी, हेच माझं जीवन'
आणि एक तरुण मुलगी
मोबाइलच्या पडद्यापलीकडे
जगभरच्या संघर्षांशी जोडली जात होती
लाल झेंडे आताही उभे राहत होते
कधी रस्त्यांवर
कधी डोंगरांवर
कधी डिजिटल आकाशात
कारण शोषणाने सीमा मानल्या नव्हत्या
तर प्रतिकार कसा मानणार?

खरं सांगायचं तर जग बदलण्याचं वचन
आताही अपूर्णच होतं
पण दरवर्षी एक मे दिवशी
जेव्हा एखादी महिला-कामगार
किंवा एखादा दलित-आदिवासी
आपली मुठ आवळतो/आवळते
तेव्हा इतिहास
थोडासा पुन्हा लिहायला सुरुवात करतोः

**- सुधीर ढवळे**

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**